# संपादकीय

## ग्रंथव्यवहार, विद्यापीठे व मराठी

एकूणच जगातील ग्रंथव्यवहार हा व्यापक आणि सर्वस्पर्शी होऊ लागला आहे; आणि विविध विषयांवरची विविध प्रकारची पुस्तके मोठ्या प्रमाणावर प्रकाशित होऊ लागली आहेत. पूर्वी कोणतीही मोठी प्रकाशनसंस्था कथाकादंबऱ्याकाव्य इत्यादी वाङ्मयप्रकारातील पुस्तके जास्त काढत असे; आणि नामवंत लेखक आपल्या यादीत असावेत म्हणून प्रयत्नशील असे. आता तसे काही मानदंड उरलेले नाहीत. एखाद्या बेस्ट सेलर कादंबरीपेक्षाही 'ए ब्रीफ हिस्टरी ऑफ टाइम'सारखे विज्ञानावरचे पुस्तक जास्त खपू शकते;'नोस्ट्रॅडमसचे भविष्य'लाखोंनी खपते. हॅरी पॉटरसारखे कुमार कथेचे पुस्तकही आठ कोटींच्या घरात विक्रीची मजल गाठते. पूर्वी उत्तम कादंबऱ्यांना जो भाव होता, तो आता अशी वेगवेगळ्या विषयांवरची पुस्तके मिळवू लागली आहेत. ज्योतिष, पाकशास्त्र, योग, आरोग्य, पर्यटन, जनरल नॉलेज, फेंगशुई, वास्तुशास्त्र, व्यक्तिमत्त्वविकासविषयक पुस्तके, यशाचा कानमंत्र देणारी पुस्तके, ही आता कोणाही यशस्वी प्रकाशनसंस्थेच्या यादीमध्ये मोठ्या संख्येत आढळतात. आणि या पुस्तकांमुळेच त्या प्रकाशनसंस्था या स्पर्धेच्या युगात आपला नफा टिकवण्यात कामयाब होतात. पूर्वी पाठ्यपुस्तकांच्या विक्रीतून होणाऱ्या फायद्याने प्रतिष्ठेसाठी ललित पुस्तकांची निर्मिती होई. मराठीत पाठ्यपुस्तकांची मक्तेदारी सरकारकडे गेल्याने तो उत्पन्नाचा मार्ग बंद झाला. त्यामुळे एकूणच ग्रंथव्यवहारात एकांगीपणा आला. ललित वाङ्मयाच्या प्रकाशनातले प्रकाशकांचे स्वारस्य संपले. आज कादंबऱ्यांच्या प्रकाशनाबाबत आणि त्याही गाजलेल्या, पुरस्कार विजेत्या किंवा लोकप्रिय लेखकांच्या असल्या तर व्यावसायिक प्रकाशक थोडीफार उत्सुकता व उत्साह दाखवतात. कथा, काव्य, ललितलेख इत्यादी बाबत बहुधा टाळाटाळ करण्याचीच प्रवृत्ती दिसते. ग्रंथालये व महाविद्यालये यांच्या अनुदानाच्या बेभरवशामुळे अशा पुस्तकांचा उठाव कमी होत आहे; आणि एकूणच ग्रंथव्यवहारावर त्याचा प्रतिकूल परिणाम जाणवणे अपरिहार्य आहे.

काव्यसंग्रह हे तर आता सर्रास स्वत: कवीच स्वखर्चाने काढत आहेत, प्रकाशक म्हणून नाव मग कोणाचे का असेना. आत्मचरित्रेही बहुतेक लोक स्वत:च पैसे खर्च करून काढताना दिसतात. कारण सर्वसामान्य व्यक्तीच्या सर्वसामान्य आणि सरधोपट आयुष्यात सर्वसाधारण वाचकाला पकडून ठेवील असे नाट्यपूर्ण फारसे काही नसते.

महाविद्यालयांमधले मराठीचे अभ्यासक्रम हे अजूनही संतसाहित्य, पंतकवी आणि रविकिरण मंडळ यातच घोटाळत आहेत. नावापुरते दलित साहित्य, ग्रामीण साहित्य किंवा स्त्रीवादी साहित्य अभ्यासक्रमात समाविष्ट केले जाते; परंतु बाकीच्या समकालीन साहित्याबाबत विद्यापीठीय अभ्यासक्रम बहुतांशी उदासीन वृत्तीच दाखवणारा आढळतो. त्यामुळे समकालीन लेखककवींच्या अभ्यासाची गरज प्राध्यापकांनाही वाटत नाही; आणि केवळ परीक्षार्थी म्हणून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना तर मुळीच वाटत नाही.

'मराठी' विषय घेऊन एसएस्सी वा बीए होणाऱ्या बहुतेक विद्यार्थ्यांचा अनुभव असा की मराठीच्या प्रश्नपत्रिकेत त्यांना इतर विषयांच्या तुलनेने कमी गुण पडतात आणि त्यामुळे त्यांची



एकूण टक्केवारी खाली येते. यंदा दहावीत पहिल्या आलेल्या मुलाला मराठीत ९४ टक्के गुण पडले; हे वाचून त्यामुळे आश्चर्यच वाटले. खुद्द परीक्षकांचा किंवा एसएस्सी बोर्डाचाही त्यावर विश्वास बसला नसावा; म्हणून इतर सर्व विषयात ९०च्या वर गुण असताना नागपूरच्या प्रज्वल महात्मे याला मराठीत फक्त २४ गुण असे गुणतक्त्यात दाखवून त्याला चक्क नापास ठरवण्यात आले. प्रथम जाहीर झालेल्या गुणवत्ता यादीत त्याचे नाव त्यामुळे येऊच शकले नाही. त्या मुलाने तक्रार केल्यावर नागपूरच्या संबंधित एसएससी बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी फेरतपासणी केली आणि मराठीत २४ नव्हे तर ९४ गुण आहेत हे पडताळून बघून, प्रज्वल महात्मे याला पास तर केलेच; उलट त्याच्या गुणांची संख्या गुणवत्ता यादीत प्रथम म्हणून जाहीर केलेल्या उमेदवारापेक्षाही जास्त असल्याने, ती यादी दुरुस्त करून प्रज्वलला पहिला म्हणून घोषित करणे भाग पडले. एसएस्सी बोर्डाचा हा गलथानपणा अक्षम्य व शर्मनाक तर आहेच; परंतु मराठी हा विषय घेणाऱ्या मुलांवर जो अन्याय होतो, त्याचाही निदर्शक आहे.

'मराठी' मातृभाषा असल्याने मुले ती घेतात; तथापि मराठीचे पेपर तपासताना मराठीत नेहमीच गुण फार कमी दिले जातात. संस्कृत, जर्मन, इंग्लिश, उर्दू घेणाऱ्या मुलांना नव्वदावर गुण मिळू शकतात, पण मराठीत कितीही उत्तम पेपर लिहिला तरी साठसत्तर फार तर८०वर गुण दिले जात नाहीत. त्यामुळे हुशार विद्यार्थ्यांच्या एकूण टक्केवारीवर प्रतिकूल परिणाम होतो. मराठी भाषेवर प्रेम असल्याबद्दल विद्यार्थ्यांना आपलेच मराठी परीक्षक ही शिक्षा देतात, आणि त्यांचे करीयर बरबाद करण्यात धन्यता मानतात. ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

विद्यार्थ्याने अगदी वाचनीय व मुद्देसूद निबंध लिहिला तर दहापैकी दहा गुण द्यायला काय हरकत आहे? पण तरी त्याला सहाच्या वर गुण देताना परीक्षकांचा हात आखडतो. तोच इंग्लिशमध्ये निबंध असला तर जास्त गुण मिळतात. मराठीच्या विद्यार्थ्याकडून मराठी परीक्षक फार मोठ्या अपेक्षा बाळगतात. ते स्वत: परीक्षेला बसले तरी त्या पूर्ण करू शकणार नाहीत. तरीही विद्यार्थ्यांना मात्र कमी गुण देऊन ते त्यांची टक्केवारी खाली आणतात आणि त्यांना पुढे पदवीपरीक्षेच्या प्रवेशाला किंवा इतर नोकऱ्या मिळण्याबाबत कायमचे न्यूनगंडाने पछाडून टाकतात. मुलाखत घेणारे टक्केवारी बघतात. तुम्ही संस्कृत वा जर्मन घेतलेय की मराठी हे बघत नाहीत. संस्कृतचे पाठांतर असले किंवा जर्मन अगदी मोजकेच परीक्षेच्या दृष्टीने तेवढेच अभ्यासिलेले असले तरी त्यात नव्वदावर गुण परीक्षक देतात. मराठीच्या बाबतीत मात्र नको तेवढा अपेक्षांचा बडगा दाखवून कमीतकमी गुण देण्यात कृतकृत्यता मानतात. 'मराठी'च्या परीक्षकांची ही वृत्ती बदलल्याशिवाय मराठी विषय घेणाऱ्यांची ससेहोलपट होतच राहणार!

ग्रंथजगतच्या याच अंकात आम्ही 'साहित्यवार्ता'मध्ये अंबाजोगाई येथील एक बातमी दिलेली आहे. त्या बातमीतही मराठी घेणाऱ्या मुलांना कमी गुण मिळाल्याने त्यांची एकूण टक्केवारी कशी कमी आली याची काही उदाहरणे दिलेली आहेत. खरे तर, वर्षानुवर्षे सर्वत्र हाच प्रकार चालला आहे. आणि मराठी घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गळचेपी केली जात आहे.

आणखी एक उदाहरण देता येईल.

पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ इत्यादींनी गेल्या दहा वर्षांतील मराठीत बीए-एमएला सर्वात वरचे क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची मराठी विषयातील टक्केवारी पहावी आणि संस्कृत वगैरे अन्य भाषांतील सर्वोच्च गुण मिळवणाऱ्या टक्केवारीशी तिची तुलना करावी.

आमची खात्री आहे की मराठीतील गुणांची टक्केवारी ही कमी आढळेल.

विज्ञानशाखेतील बीएस्सी, एमएस्सीमधील गुणवत्ता यादीतील मुलांच्या टक्केवारीशी तुलना केली तर मराठीच्या वाट्याला येणारी अवहेलना अधिकच यातना देणारी ठरेल. खरे तर विज्ञानात परीक्षेत ऐंशी नव्वद टक्के मिळवणारे विद्यार्थी आणि मराठीत साठवर टक्के मिळवणारे विद्यार्थी हे बुद्धिमत्तेत जवळजवळ सारखेच असतात; परंतु 'मराठी'चे पेपर काढणारे व तपासणारे परीक्षक आणि विज्ञानाचे पेपर काढणारे व तपासणारे परीक्षक यांच्या मानसिकतेत मोठाच फरक दिसतो. त्यामुळे हा सगळा घोटाळा होतो. मराठीच्या पदरी नेहमीच दारिद्र्याची लक्तरे पडतात; आणि उंची राजवस्त्रे इतरांच्या अंगावर खुलतात.

एसएस्सी, बी.ए., एम.ए. वगैरे परीक्षांच्या अभ्यासक्रमात व प्रश्नप्रक्रियेत उचित बदल करून, विज्ञानाप्रमाणेच त्यातही भरपूर गुण मिळू शकतील अशी पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे. तसे न केल्यास मराठी घेणाऱ्यांची कायमच कुचंबणा होत राहील. टक्केवारीच्या स्पर्धेत ते कायमच तळाशी राहतील आणि आयुष्यातही अनेक संधींपासून वंचित राहतील.

मराठीवर प्रेम करणाऱ्यांना आपणच जणू सुळावर चढवत आहोत आणि त्यांची आयुष्ये बरबाद करीत आहोत. परीक्षेतील गुणांवर नोकऱ्या व स्पर्धात्मक प्रवेश अवलंबून असल्याने, दहावीत किंवा पदवीत मराठी घेणाऱ्यांना कायम मान खाली घालूनच मुलाखतींना जावे लागते; आणि आपल्या हुशारीला बाजारात काही किंमत नाही हे अनुभवत एका नकाराकडून दुसऱ्या नकाराकडे जात राहावे लागते. मराठी ही राज्यभाषा हे शासनाचे धोरण आहे. तर मग मराठी घेऊन पदवीधर होणाऱ्यांना नोकऱ्यात प्राधान्य द्यावे, जादा वेटेज द्यावे, जादा इन्क्रीमेंटस् द्यावी; असे काही धोरण सरकार का जाहीर करीत नाही? तसे केले तर मराठीकडे पाहण्याची दृष्टीही बदलेल. नाहीतर 'महात्मे'प्रमाणे इतरांचीही कुचंबणा होत राहील. मराठी माणसाचे सर्वच व्यवहार जर गतिमान व स्पर्धात्मक व्हायचे असतील तर 'मराठी'चे गुणांकन करण्याबाबतच्या परीक्षकांच्या वृत्तीत बदल व्हायला हवा. एसएस्सी बोर्ड व विद्यापीठे यांच्या दृष्टिकोनात फरक व्हायला हवा. मराठी टिकवायची असेल, मराठी विषयाचा अभ्यास करणाऱ्यांची संख्या व महत्ता वाढवायची असेल, तर असे काही करण्यावाचून गत्यंतर नाही.

**-संपादक**

## अभिनंदन!



प्रसिद्ध विज्ञानलेखक निरंजन घाटे यांना नुकतेच महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे **'विशेष ग्रंथकार पुरस्कार'** हा मानाचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. विविध लेखन प्रकारात दीर्घकाळ लेखन करणाऱ्या ज्येष्ठ ग्रंथकारांना हा पुरस्कार दिला जातो.

यावर्षीच्या मराठी बालकुमार साहित्यसभेतर्फे देण्यात येणारा स्नेह पुरस्कारही घाटे यांच्या 'अद्भुत किमया' या पुस्तकास देण्यात आला. या पुरस्कारांबद्दल निरंजन घाटे यांचे हार्दिक अभिनंदन!



# साहित्यवार्ता

## आकांक्षाच्या कवी श्रीधर शनवारे विशेषांकाचे प्रकाशन

आकांक्षा मासिकाच्या वाटचालीत या महाराष्ट्र दिनापासून वाङ्मयीन विशेषांकाची सुरुवात झाली. मे २००२चा अंक कवी श्रीधर शनवारे विशेषांक म्हणून प्रकाशित झाला. नागपूर येथे ८ मे २००२ला आकांक्षा लॉनवर झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून, शंकर सारडा तर अध्यक्ष डॉ.मदन कुलकर्णी हे उपस्थित होते.

या विशेषांकाने एका दर्जेदार कवीचे उपेक्षितपण दूर केले आहे; आणि हा अंक पाहिल्यावर दर्जेदार कविता लिहूनही या कवीची पाहिजे तितकी दखल महाराष्ट्रात घेतली गेली नाही, असे मत शंकर सारडा यांनी व्यक्त केले. आजच्या वाचन संस्कृतिऱ्हासाच्या काळात वाङ्मयीन संस्कृती जोपासणे कठीण झाले आहे. या कार्यात वर्तमानपत्रांना मर्यादा पडतात. सर्वच लेखकांना संधी देण्याच्या प्रयत्नात व्रतस्थ लेखक सातत्याने वाचकांसमोर आणता येत नाहीत. जागेच्या मर्यादांमुळे त्यांना पुरेसा न्यायही देता येत नाही. त्यामुळे व्रतस्थ लेखकांची गोची होत आहे. तेव्हा लेखकांना खरा वाव मासिकेच देऊ शकतात असे सांगून आकांक्षा हे काम करीत असल्याबद्दल त्यांनी अभिनंदन केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. मदन कुळकर्णी यांनी श्रीधर शनवारे यांच्या कवितेचे अनेक पैलू स्पष्ट केले. श्रीधर शनवारे यांची कविता सामाजिक जाणिवेची उत्कटता जोपासते याकडे लक्ष वेधले.

कविता ही माझ्यासाठी व्रत आहे. पैसा वा प्रसिद्धीसाठी मी कविता कधीही लिहिली नाही. प्रतिमेचे जे दान आपल्या पदरात पडले, त्याचा पुरेपूर वापर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आपण केला असे मनोगत कवी श्रीधर शनवारे यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा.देवानंद सोनटक्के यांनी तर आभार प्रदर्शन मीनल वानखेडे यांनी केले.

## 'सर्वज्ञ कादंबरीत कलात्मकता व ऐतिहासिकता यांचा संगम'

संतांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा शोध कलात्मक शब्दांत घेणे कठीण आहे. त्यात श्री चक्रधरस्वामींसारख्या युगप्रज्ञावंताच्या जीवनावर कादंबरी लिहिणे, हे तर अत्यंत अवघड होते. मात्र, डॉ. प्र.न. जोशींसारख्या सिद्धहस्त लेखकाने स्वामींच्या जीवनावरील सर्वज्ञ कादंबरी लिहिताना कलात्मकता व ऐतिहासिकता याचे पुरेपूर भान पाळले आहे, असे उद्गार 'ज्ञानमोचक'चे संपादक डॉ. रमेश आवलगावकर यांनी स्नेहवर्धन प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या डॉ.प्र.न.जोशी यांच्या 'सर्वज्ञ' कादंबरीच्या प्रकाशन समारंभात काढले. अध्यक्षस्थानी डॉ.प्र.ल.गावडे होते. डॉ.प्र.न.जोशी

यांच्या ७८व्या वाढदिवसाचे निमित्त साधून या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

याच कार्यक्रमात स्नेहवर्धन प्रकाशनाचा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रमही पार पडला. डॉ.प्र.न.जोशी संतमित्र पुरस्कार प्रा. कृष्णा गुरव यांना, तर पु.न.जोशी विज्ञानमित्र ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार डॉ.आनंद शिंदे यांना दिला. डॉ.द.दि.पुंडे समीक्षामित्र ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार साधना आमटे यांच्या आत्मचरित्रास मिळाला. डॉ.स्नेहल तावरे यांनी आभार मानले.

### संत नामदेव महाद्वार पंढरपुरात बांधणार

श्री संत नामदेव पायरीजवळ श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने सुमारे पाच लाख रुपये खर्च करून संत नामदेव महाद्वार बांधण्यात येणार आहे. आषाढी यात्रेनंतर या कामाला सुरुवात होणार आहे.

श्री विठ्ठल मंदिराजवळ श्री संत नामदेव व त्यांच्या १४ कुटुंबियांनी समाधी घेतली. त्या ठिकाणी संत नामदेव महाद्वार बांधण्याचा निर्णय विवेकानंद महाराज वासकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने घेतला होता. या कामाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने त्यांनी वेगाने प्रयत्न सुरू केले होते. या कामाला शशिकांत पागे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आषाढी यात्रेनंतर प्रारंभ करण्याचे ठरविले आहे. या कामाअंतर्गत श्री विठ्ठल मंदिराचा कोणताही मूळ भाग पाडण्यात येणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

### अस्थिर परिस्थितीत साहित्यिक, कलावंतांवर मोठी जबाबदारी

देशात आज अयोग्य घटना घडत आहेत, अशा परिस्थितीत साहित्यिक व कलावंतांवर फार मोठी जबाबदारी आहे, असे मत शेकापचे ज्येष्ठ नेते प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी सातारा येथे व्यक्त केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमीच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सामाजिक, राजकीय स्थिती व साहित्यिक कलावंतांची जबाबदारी या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते.

वास्तवाचे चित्रण करण्याची जबाबदारी साहित्यिकाची आहे. समाजामध्ये भोगणारे असतात, उपभोगणारेही असतात. त्या त्या वर्गाला भावणारे वास्तव वेगवेगळे असते. वास्तवाचे भान ठेवून समाजास विशिष्ट वळण देण्याचे काम साहित्यिक करू शकतात. डॉ.आंबेडकर यांनी राज्यघटना तयार केली. त्यावेळी अंतर्विरोधाचा मुद्दा त्यांनी मांडला होता. सामाजिक, आर्थिक विषमता संपत नाही तोपर्यंत राजकीय समतेला अर्थ नाही. त्यामुळे असा पिचणारा वर्ग एक दिवस लोकशाहीचा डोलारा उद्ध्वस्त केल्याशिवाय राहणार नाही, हा अंतर्विरोध संपविण्याचे सामर्थ्य साहित्यिक व कलावंतांमध्ये असते.

डॉ.जब्बार पटेल म्हणाले, अवतीभोवतीची स्थिती पाहिल्यावर, अस्वस्थ झाल्यावर आपल्या समोरील माध्यमातून त्याची नोंद प्रामाणिकपणे करणे महत्त्वाचे आहे. तसेच इतिहासकारांनी लिहिलेला इतिहास आणि त्याच काळात साहित्यिकांनी लिहिलेले साहित्य यामध्ये लेखक, कलावंत जी नोंद करतो, तो इतिहास असतो.

प्रा.भा.ल.भोळे म्हणाले, स्थितीप्रमाणे लेखक, कलावंत बदलत असतात. पूर्वी कलाकृती



निर्माण करण्याची विशिष्ट वर्गाची मक्तेदारी आता संपली आहे. सामान्य माणसांच्या जगण्याच्या प्रश्नांना साहित्यात प्राधान्य दिले पाहिजे. वास्तव सोसणे असह्य आहे, असे आपण सांगतो त्यावेळी त्याची कारणमीमांसा करता आली पाहिजे. वास्तवाची पोपटपंची म्हणजे कलाकृती नव्हे.

लिहिण्याचा व्यवहार समाजाशी संबंधित आहे, भोवतालच्या घटनांचा कळत नकळत परिणाम होत असतो, त्यामुळे लेखनाची प्रतिक्रिया आणि एकूण समाजवास्तव यात लिहिणाऱ्याची जबाबदारी काय असावी, एक नागरिक म्हणून आपण जबाबदारी पार पाडू शकतो का, याचे अस्वस्थपण मनात असते. ते उत्तर आपण शोधले पाहिजे, असे प्रा. राजन गवस यांनी सांगितले.

प्रा.यशवंत सुमंत यांनी परिसंवादाचे प्रास्ताविक केले. अकादमीचे कार्याध्यक्ष किशोर बेडकिहाळ यांनी स्वागत केले. यावेळी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ.भोळे व प्रा.गवस यांचा सत्कार करण्यात आला. कवी प्रमोद कोपर्डे यांच्या 'तळठाव घेताना' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन डॉ.भोळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी ज्येष्ठ कवयित्री शान्ता शेळके यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. चंद्रकांत कांबिरे यांनी सूत्रसंचालन केले.

### 'निखळ कविता व्यक्त करण्याची अनेक माध्यमे'

कविता अनेक पदरी असते. वाचकानुसार आणि सौंदर्याच्या व्यक्तिगणिक बदलत्या संकल्पनेनुसार कवितेला अनेक तऱ्हांनी भिडता येते. ती अनेक माध्यमांतून व्यक्त होऊ शकते. निखळ कवितेला साजेशा संगीताची जोड मला मिळाली म्हणून ध्वनिफितीचे माध्यम मी या वेळी स्वीकारले, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी ना.धों. महानोर यांनी केले.

सोनी म्युझिकतर्फे ना.धों. महानोर यांच्या कवितांची 'दूरच्या रानात' ही ध्वनिफीत प्रकाशित करण्यात आली. 'रानातल्या कविता' आणि 'पानझड' या संग्रहातील कवितांचा यात समावेश आहे. अभियान आर्टतर्फे याची निर्मिती करण्यात आली आहे. संगीत संयोजन नरेंद्र भिडे यांचे आहे.

१९६५नंतर एकूणच कविता, नाटके, चित्रपट, साहित्य, संगीत... हे कलाप्रकारच बदलत गेले. माझी कविता या बदलत्या काळातच घडत गेली. माझ्याआधी लिहिली गेलेली निसर्गकविता आणि माझी कविता यात नक्कीच वेगळेपण आहे. हे वेगळेपण संगीताची साथ लाभल्याने अधिकच गडद होत असल्याचा अनुभव रसिकांना या ध्वनिफितीतून येईल.

''या कवितांचे विषय वेगवेगळे आहेत. त्यातून निसर्ग तर भरून राहिला आहेच; पण कवीच्या अंत:करणात खोलवर रुजलेल्या दु:खाचा, एकाकीपणाचा अंत:सूरही आहे. संगीताचे त्यावरील संस्कार हा अनुभव अधिक गर्द करत जातात,'' असेही ते म्हणाले. मी माझ्या कविता स्वत:च सादर करत आलो आहे; प्रत्येक कवीची स्वत:ची अशी शब्दकळा असते. तशी माझीही आहे. या ध्वनिफितीतील कवितांचे संगीतही यामुळे निराळे झाले आहे, असे त्यांनी सांगितले.

### दादर सार्वजनिक वाचनालय - नाबाद ९५

पूर्वी दूरदर्शनवर मोजकेच कार्यक्रम असल्याने आणि टिव्ही देखील घरोघरी नसल्याने मनोरंजनाच्या साधनांमध्ये पुस्तके अग्रक्रमावर असायची. वाचनाची गोडी लागल्याने अनेकांचा पुस्तकाकडे ओढा असायचा. अशावेळी वाचकांना फारसे पैसे खर्च न करता त्यांच्या आवडीची पुस्तके वाचायला मिळावी, यासाठी १९०७ मध्ये दादर सार्वजनिक वाचनालय या संस्थेची स्थापना

झाली. दादरमधील या वाचनालयाची माहिती मिळाल्यानंतर वाचनालयाचे सदस्य वाढू लागले. येथील काही दानशूरांच्या मदतीनं १९२७ मध्ये टिळक पुलाजवळील स्वत:च्या मालकीच्या वास्तूमध्ये संस्थेचं वाचनालय सुरू झालं. जागा मिळाल्यानंतर आपोआपच पुस्तकांचा संग्रह आणि वाचकांची सुख्या वाढत गेली.

१९७१मध्ये संदर्भ ग्रंथालय सुरू करण्यात आले. १९०७ मध्ये लावलेल्या या वाचनालयरूपी रोपट्याचं आज डेरेदार वृक्षात रूपांतर झालं आहे. या वाचनालयात एकूण ६० हजार८३७मराठी ग्रंथ आणि १९ हजार ९९४ इंग्रजी ग्रंथ आहेत. पुस्तक खरेदीचं वर्षाचं अडीच लाख रुपयांचं बजेट आहे. आतापर्यंत या वाचनालयाचे साडेचार हजार सदस्य झाले आहेत. वाचकांना हवी असलेली नवनवी पुस्तके लगेच मिळावीत असा संस्थेचा नेहमीच प्रयत्न असतो. पुस्तकं खरेदी करताना या यादीत वाचकांनी सुचविलेल्या पुस्तकांचाही समावेश असतो. एखाद्या वाचकाला हवं असलेलं पुस्तक उपलब्ध नसल्यास, ते उपलब्ध झाल्याबरोबर त्या वाचकाला येथील कर्मचारी आवर्जून कळवितात. वाचक एकदा या संस्थेचा सदस्य झाला की तो सहसा सदस्यत्व सोडत नाही. सदस्यत्व रद्द करू नये यासाठी प्रयत्नही केले जातात. वाचकांसाठी सुरू केलेली ही चळवळ थांबू नये, ती वाढावी यासाठीच हे प्रयत्न केले जातात. वाचक चळवळीला पूरक अशा मुलाखती, स्पर्धा आणि मेळाव्यांचे आयोजनही केले जाते.

काळाची पावलं ओळखून १९९६मध्ये सभासदांना संगणकाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. संगणक सेवेमुळं सभासदांना सर्व माहिती त्वरित मिळण्यास मदत होत आहे. सध्या वाचनालयात ग्रंथांची देवाणघेवाण, वर्गणीची नोंद, ग्रंथकारांच्या नावाप्रमाणं याद्या या सर्व गोष्टी संगणकामुळं सोयीस्कर झाल्या आहेत.

वाचनामुळं अनेक गोष्टी समजतात. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वामध्ये सुधारणा होते. जगात फिरता आलं नाही तरी तेथील स्थळांची, लोकांची, त्यांच्या राहणीमानाची माहिती मिळते. वाचनामुळे विचार करण्याची क्षमताही वाढते. परिस्थितीकडं बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. पुस्तकं ही मित्रासारखी असतात. ती आपल्याला जे वास्तव आहे ते स्पष्टपणे सांगतात. जीवनात अनेक संकटं येऊनही आपलं ध्येय गाठणाऱ्या अनेकांचे अनुभव मार्गदर्शक ठरू शकतात.

या आधीची पिढी करमणुकीची साधने नसल्यामुळे वा अन्य अनेक कारणामुळं वाचनाकडे आपोआपच आकृष्ट झाली. प्रश्न आहे तो सध्याच्या पिढीचा. दादर सार्वजनिक वाचनालय वाचकांची संख्या वाढावी म्हणून प्रयत्न करीत आहे. तरुणांनी पुस्तकांना आपलेसे केले तर यात त्यांचा फायदा आहेच. शिवाय विचाराची, ज्ञानाची गंगा घराघरांत नेणाऱ्या वाचनालयांनाही सदस्य वाढल्याने ज्ञानाची ही गंगा इतरांकडेही नेण्यास मदत होणार आहे.

## साने गुरुजींचा सहवास हे चिरंतन टिकणारे वैभव : जोशी

''साने गुरुजींचा सहवास हे माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे आणि चिरंतन टिकणारे वैभव आहे,''अशा शब्दांत डॉ.ग.ना.जोशी यांनी साने गुरुजींविषयीची कृतज्ञता व्यक्त केली.

साने गुरुजींच्या बावन्नाव्या पुण्यतिथीनिमित्त लीलाधर हेगडे यांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन डॉ.जोशी यांच्या हस्ते झाले.

डॉ. जोशी म्हणाले,''गुरुजींचे आयुष्य नि:स्वार्थी, निरपेक्ष आणि नि:स्पृह होते. वज्राहून



कठीण आणि कुसुमाहून मऊ असलेले गुरुजी आत्मप्रामाण्यवादी आणि लोकोत्तर होते. गुरुजींची थोरवी लोकांना समजू शकली नाही. त्यामुळे ते अखेरपर्यंत उपेक्षित राहिले.''

साधना प्रकाशनच्या बालकुमार विशेषांकाचे व अकबर आगा यांच्या 'असे होते साने गुरुजी'या हस्तलिखिताचे प्रकाशन डॉ.जोशी यांच्या हस्ते झाले.

''लीलाधर हेगडे सिद्धहस्त लेखक आहेत. विविध विषय सहजतेने हाताळण्यात त्यांचा हातखंडा आहे.'' असे प्रा.प्रधान यांनी प्रास्ताविकात सांगितले. साधना साप्ताहिकाचे संपादक नरेंद्र दाभोलकर यांनी आभार मानले.

## मराठी वाचकांची दखल घेण्याची गरज

साहित्य संमेलनासारख्या व्यासपीठावर वाचकांची फारशी दखल घेतली जात नाही, अशी खंत ज्येष्ठ साहित्यिक शिवाजी सावंत यांनी व्यक्त केली.

दिवाळी वार्षिकांक समितीच्या वतीने उत्कृष्ट वाचक स्पर्धेतील विजेत्यांना त्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा.नागनाथ कोत्तापल्ले अध्यक्षस्थानी होते.

सावंत पुढे म्हणाले,''साहित्य संमेलनासारख्या महत्त्वपूर्ण व्यासपीठावरही वाचकांची फारशी दखल घेतली जात नाही. मराठी वाचविण्यासाठी वाचकांचा फार मोठा सहभाग आहे. मात्र, आज मराठी वाहिन्यांचे मराठी भाषेवरच एक प्रकारे आक्रमण होत आहे. मराठी बातम्या आणि मालिकांमधून भाषेचा दिवसाढवळ्या अक्षरश: खून पाडला जात आहे. अशा वेळी या विरोधात आवाज उठविण्यासाठी वाचकांनी पुढे येण्याची आवश्यकता आहे.''

वाचक हा साहित्य व्यवहारातील महत्त्वाचा घटक असून, तोच केंद्रस्थानी मानून त्या दृष्टीने या क्षेत्रातील सर्वांचीच वाटचाल होण्याची गरज आहे, असे मत प्रा.कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले.

पाच हजार रुपयांचे पहिले पारितोषिक महेंद्र प्रभाकर भामरे यांना, दुसरे पारितोषिक राजाभाऊ पांचाळ साकोळकर व सारिका पारखी यांना विभागून तर तिसरे एक हजार रुपयांचे पारितोषिक द.श्री.कुलकर्णी, म.श्री.दीक्षित व प्राचार्य डी.बी.पाटील यांना विभागून देण्यात आले.

एक हजार रुपयांचा आयडियल त्रिवेणी पुरस्कार वसंत धोंडो जोशी यांना व बालमैफल पुरस्कार प्राची पारकर हिला देण्यात आला. विजेत्यांना 'दिवा चषक'ही देण्यात आला.

## भारतीय भाषांमधून 'ई-मेल'साठी 'सी-डॅक'द्वारे 'लीप मेल' प्रणाली

भारतीय भाषांतून ई-मेल करणे सुलभ होण्यासाठी पुणे येथील 'सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग'ने (सी-डॅक) 'लीप मेल'प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीमुळे अकरा भारतीय भाषांतून थेट ई-मेल करण्याची व स्वीकारण्याची सोय होणार आहे.

आसामी, बंगाली, गुजराती, हिंदी, कन्नड, मल्याळम, मराठी, उडिसर, पंजाबी, तमीळ तेलगू आणि इंग्रजी या सर्व भाषांसाठी एकाच प्रणालीतून ई-मेल करण्याची सुविधा 'लीप मेल'मुळे मिळणार आहे. 'सी-डॅक'चे कार्यकारी संचालक आर.के.अरोरा यांनी पुणे येथे पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. भारतीय भाषांतून 'ई-मेल'चा प्रश्न या प्रणालीमुळे पूर्णपणे सुटू शकेल, असा दावा त्यांनी केला. 'लीप मेल'ही इंटरनेटवर आधारित प्रणाली आहे. त्यातील सूचना इंग्रजीत किंवा दहा

भारतीय भाषांतून उपलब्ध आहेत. सर्व भाषांसाठी एकाच प्रकारचा ‘की-बोर्ड’आहे. शिवाय भारतीय भाषा उच्चारानुसार लिहिण्याची सोय येथे आहे. ही प्रणाली वापरण्यास अतिशय सोपी आहे. जेथे ई-मेल करावयाचा आहे, तेथील संगणकावर ही प्रणाली नसली तरी मेल उघडता येते. त्यामुळे ही प्रणाली वापरण्यात कोणतीही अडचण नाही, असे श्री.अरोरा यांनी नमूद केले. ही प्रणाली वापरण्याच्या एका परवान्यासाठी पाच हजार रुपये शुल्क आकारले जाईल,“ही प्रणाली अधिकाधिक लोकांपर्यंत जावी यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. काही भागीदारही त्यासाठी निवडणार आहोत, नेट कॅफे आणि इंटरनेट साईटस् यांच्यापर्यंत प्रणाली जावी यासाठीही प्रयत्न करीत आहोत’’ ‘सी-डॅक’च्या जिस्ट (ग्राफिक अँड इंटेलिजन्स बेस्ड स्क्रिप्ट टेक्नॉलॉजी) विभागाने ही प्रणाली विकसित केली आहे. “ही प्रणाली संगणकावर बसवून घेण्याची पद्धत अतिशय सोपी आहे; तसेच भाषिक की-बोर्डबद्दल संगणकाच्या पडद्यावर माहिती उपलब्ध असणार आहे.’’

### अक्षरधाराचे १५०वे प्रदर्शन

अक्षरधारा संस्थेच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन आचार्य अत्रे सभागृहात ज्येष्ठ अभिनेते डॉ.श्रीराम लागू यांच्या हस्ते झाले. या उपक्रमाचे प्रायोजक असलेल्या ‘सकाळ’चे वृत्तसंपादक सुरेशचंद्र पाध्ये कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. महापौर दीप्ती चौधरी या वेळी उपस्थित होत्या.

हे एकशे पन्नासावे ग्रंथप्रदर्शन शान्ता शेळके यांच्या स्मृतीस समर्पित करण्यात आले आहे. त्यांना श्रद्धांजली वाहूनच कार्यक्रमाला सुरवात झाली.

“जोपर्यंत माणसाला ज्ञानाची लालसा आहे, जीवन जाणून घेण्याची आस आहे, तोपर्यंत वाचनसंस्कृती नष्ट होणार नाही’’ असे ज्येष्ठ कादंबरीकार शिवाजी सावंत यांनी सांगितले.

“सातशे वर्षांनंतरही ज्ञानेश्वरी जिवंत आहे, तेथेच पुस्तकांचे महत्त्व पटते. विज्ञान गतिमान झाल्याने वाचनसंस्कृतीवर दूरचित्रवाणीसारखी आक्रमणे सध्या आहेत त्यापेक्षा अधिक येतील, पण त्यामुळे ग्रंथांचे महत्त्व शून्य होईल, असे वाटत नाही. ज्ञान समजून घ्यायचे असेल, तर ग्रंथाशिवाय पर्याय नाही.’’

“वाचनाची कमी झालेली आवड ही अधिक काळ टिकणार नसून, पुन्हा वाचनसंस्कृती येईल.’’असा आशावाद डॉ.लागू यांनी व्यक्त केला. आपल्या साहित्यवेडाचे श्रेय त्यांनी चित्रपटसृष्टीला दिले.

श्री.पाध्ये म्हणाले,“आठ वर्षांच्या काळात भरणारे हे दीडशेवे ग्रंथप्रदर्शन म्हणजे वाचले जात असल्याचेच निदर्शक आहे. ‘वाचत्या काळा’पेक्षा सध्याचा काळ हा ‘पहाता काळ’जरी असला तरी पाहतानाही वाचतात की नाही, हा खरा प्रश्न आहे. बालपणापासून तरुणपणापर्यंत जे वाचले जाते, त्यावरच पुढील आयुष्याची जडणघडण होते.’’

ललितलेखन, कादंबऱ्या, बालसाहित्य, ज्योतिष, शब्दकोश, व्यक्तिचरित्रे, आत्मचरित्रे, स्पर्धापरीक्षांची पुस्तके, विनोदी आदी विविध साहित्यप्रकारांतील २५ हजार पुस्तके या प्रदर्शनात ठेवण्यात आलेली आहेत.

### गेल्या पंचवीस वर्षांत नाटकाची खरी समीक्षा नाही : गोखले

“गेल्या पंचवीस वर्षांत समीक्षेच्या नावाखाली मराठी नाटकांची जी समीक्षा चालली आहे,



ती समीक्षा नसून ‘रिपोर्टिंग’ आहे’’ असे मत प्रसिद्ध अभिनेते विक्रम गोखले यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ.वि.भा.देशपांडे लिखित ‘नाटकीय वेध ’आणि ‘भावलेली नाटके’या, सदानंद गोखले लिखित ‘बंडाचा अदृश्य झेंडा’, अशा तीन पुस्तकांच्या प्रकाशन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

शिवाजी सावंत कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. ज्येष्ठ संगीतकार भास्कर चंदावरकर, ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे, समीक्षक शंकर सारडा, नाटककार रामनाथ चव्हाण, विश्वास मेंहेंदळे, मधू गानू, रवींद्र दुर्गे, गंगाधर महाबंरे आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

श्री.गोखले म्हणाले,“समीक्षकांना ज्या विषयावर टीका करायची आहे त्याचे आपल्याला असलेले ज्ञान त्यांनी तपासून पाहण्याची गरज आहे. मात्र वि.भा.देशपांडे त्यातले नसून, त्यांच्या समीक्षेत माझ्याबद्दल टीका असली, तरी ती मला हवीशी वाटते.’’

नाटक या शब्दाच्या व्युत्पत्तीकडे एकाही समीक्षकाने अद्याप लक्ष न दिल्याबद्दल आश्चर्य वर्तवून श्री. सावंत म्हणाले, “स्वातंत्र्यानंतर गेल्या पन्नास वर्षात रसिकांची जाण वाढली असून, लेखक मात्र कमी पडतो आहे. सदानंद गोखले यांच्या लिखाणात न.चिं.केळकरांचा नर्म विनोदी बाज असून तो त्यांनी जपावा.’’

‘नाटक नावाचे बेट’या नावाचे पुस्तक आपण लिहिणार असल्याचे डॉ.देशपांडे यांनी सांगितले. “कुणाच्या तरी दु:खाला वाचा फोडण्यासाठी लिहितो,’’ असे मनोगत सदानंद गोखले यांनी व्यक्त केले. श्रीपाद प्रकाशनाचे सोमनाथ ढोले यांनी प्रास्ताविक केले, तर सुरेश पोरे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन उद्धव कानडे यांनी केले.

### अनुवादित साहित्याने वाङ्मयीन धारणेचा विस्तार

“आपल्याकडील संकुचित वाङ्मयीन धारणेला विस्तारित करण्याचे काम अनुवादित वाङ्मयाने शक्य होईल,’’ अये मत ज्येष्ठ समीक्षक प्रा.म.द. हातकणंगलेकर यांनी व्यक्त केले. रशियन साहित्यिक अन्तोन चेखव यांच्या कथासंग्रहातील निवडक कथांचा समावेश असलेल्या ‘चेखवच्या सात कथा’या सुमती कानिटकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन प्रा.हातकणंगलेकर यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले,“अलीकडच्या काळात अनुवादित साहित्याची लाट मोठ्या प्रमाणावर आली आहे. त्याला वाचकवर्गही मिळत आहे. याचे कारण वाचक हे नेहमी नावीन्याच्या शोधात असतात. वाचकांच्या नावीन्याची भूक अनुवादित साहित्यातून मिटू शकते. अर्थात, असे अनुवाद करतानाही चांगले, अभिजात साहित्य निवडले पाहिजे. त्यामध्ये केवळ तत्कालीन लोकप्रियता मिळालेली पुस्तके नकोत.’’

अनुवाद करताना त्या कथेमागची लेखकाची भूमिका संपूर्ण अभ्यासल्याशिवाय, समजून घेतल्याशिवाय चांगला अनुवाद होऊ शकत नाही. तसेच रशियन साहित्याची मराठी वाचकांना ओळख व्हावी, या हेतूने आपण हा अनुवाद केला असल्याचे श्रीमती कानिटकर यांनी सांगितले.

कॉन्टिनेन्टल प्रकाशनाचे संचालक अनिरुद्ध कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. देवयानी अभ्यंकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.हातकणगंलेकर यांचा अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त या वेळी कॉन्टिनेन्टल प्रकाशनातर्फे सत्कार करण्यात आला.

**'मोडकळीस आलेली कुटुंबव्यवस्था ज्येष्ठांनी सावरावी'**

''माणसामाणसातील तुटत चाललेले संबंध सावरणे, टिकविणे, वाढविणे हे उतारवयातील खरे शहाणपण शिकायचे असेल तर मोडकळीस येत चाललेली कुटुंबव्यवस्था सावरण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.'' असे मत न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

'उत्तररंग'या अंकातून प्रकाशित झालेल्या विविध लेखांचा संग्रह उत्कर्ष प्रकाशनच्या 'उत्साहपर्व'या पुस्तकात करण्यात आला आहे. या पुस्तकाचे प्रकाशन न्या.धर्माधिकारी यांच्या हस्ते झाले. 'कास्प'चे अध्यक्ष डॉ.शरच्चंद्र गोखले अध्यक्षस्थानी होते. यावेळी पुणे सराफ असोसिएशनचे अध्यक्ष दाजीकाका गाडगीळ, उत्कर्ष प्रकाशनचे सुधाकर जोशी, प्रा.रवींद्र घवी उपस्थित होते.

'वाढते वय आणि शहाणपण'या विषयावर बोलताना न्या. धर्माधिकारी म्हणाले,''प्रत्येकाने वाढत्या वयासोबत जगण्याचे शहाणपण आत्मसात करायला हवे. वयानुरूप पोक्तपणे वा बालिशपणे जगणे; आपले उर्वरित आयुष्य आपल्या मुलानातवंडांच्या उत्कर्षासाठी खर्च करणे, हे खरे म्हातारपणातील शहाणपण आहे.''

''शहाणपण हे प्रत्येकात मूलभूत असते. फक्त त्याला वाट फोडून देणे आपल्या हातात असते. सर्वांना एकत्र घेऊन जगण्याच्या शहाणपणासाठी वेगळे कष्ट करावे लागत नाहीत.'' असे डॉ.गोखले यांनी सांगितले. पुस्तकाचे संपादक सविता भावे यांनी सूत्रसंचालन केले.

**कवीची आशावादी वृत्तीच देशाला जिवंत ठेवते : सिन्हा**

परराष्ट्र खात्यातील अधिकारी ज्ञानेश्वर मुळे लिखित 'अंदर एक आसमान' या उर्दू काव्यसंग्रहाचे प्रकाशन केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे करण्यात आले. या प्रसंगी बोलताना अर्थमंत्री सिन्हा यांचीही कविवृत्ती जागृत झाली. 'कवीसारखी आशावादी वृत्तीच व्यक्ती आणि देशाला जिवंत ठेवते' असे सांगून ते म्हणाले की, वित्त आणि काव्य यांच्यात परस्पर संबंध आहे. या दोन्हीही बाबी लोकांच्या जीवनावर मोठा परिणाम घडवतात. काव्य माणसाच्या हृदयाला स्पर्श करते, तर वित्त भौतिक सुखाद्वारे. श्री.मुळे यांनी त्यावर दृष्टिक्षेप टाकला आहे. देशाच्या अर्थकारणाच्या क्षेत्रात येताना काव्याचे जग आपल्याला मागे सोडावे लागल्याबद्दल सिन्हा यांनी खंत व्यक्त केली. सर्जनात्मक लेखन करणाऱ्या मोजक्या नोकरशहांमध्ये मुळे यांचा समावेश आहे, असे सांगून सिन्हा यांनी मुलकी अधिकारी हे काव्यासारख्या थोर सांस्कृतिक परंपरेपासून दुरावत चालले असल्याबद्दल खंत व्यक्त केली.

'अंदर एक आसमान'हा प्रेम, त्याग, उत्साह, आनंद, विश्वात्मकता इत्यादी भावभावनांचे दर्शन घडविणारा काव्यसंग्रह आहे. श्री.मुळे यांनी या संग्रहातील काही कवितांचे वाचन केले. मॉरिशसमध्ये उप-राजदूत म्हणून मुळे यांची बदली झाली आहे. १५जुलैला ते मॉरिशसला जातील.

**'जयमाला शिलेदार रंगभूमीच्या महालक्ष्मी'**

''जयमाला शिलेदार या मराठी रंगभूमीच्या महालक्ष्मी आहेत. अनेक धैर्यधरांना धीर देणाऱ्या भामिनी आहेत. रंगभूमीवरील त्यांच्या दर्शनानेच आपण तरुण होतो.'' अशा शब्दांत नाट्यसमीक्षक गो.रा.जोशी यांनी त्यांच्या कर्तृत्वाचे कौतुक केले.

जयमाला शिलेदार यांच्या मनोगतावर आणि अनुभवकथनावर आधारित स्वाती कर्वे यांनी



लिहिलेल्या 'गंधर्वछाया' या पुस्तकाचे प्रकाशन अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते झाले. 'अक्षरछाया'या संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

गंगाधर महांबरे, डॉ.प्र.ल.गावडे यांनी ही जयमाला शिलेदार यांच्या आठवणी सांगितल्या.

**कलांवरील प्रेमामुळे पु.ल.देशपांडे अमर : पं.भीमसेन जोशी**

''गाणे, साहित्य आणि कलांवरील प्रेमामुळे पु.ल.देशपांडे अमर आहेत,'' अशी भावना ज्येष्ठ गायक पं. भीमसेन जोशी यांनी व्यक्त केली.

भारतीय टपाल खात्यातर्फे पु.ल.देशपांडे यांच्या स्मरणार्थ टपाल तिकीट प्रकाशित करण्यात आले. या तिकिटाचे प्रकाशन व वितरण दूरसंचार मंत्री प्रमोद महाजन यांच्या हस्ते झाले.

पु.ल.देशपांडे हे कलावंत म्हणून, रसिक म्हणून व माणूस म्हणूनही मोठे होते असे सांगून पं. जोशी म्हणाले, ''पु.लं.ना गाण्याच्या क्षेत्रात ओळखणारा मी छोटा माणूस आहे. ते नाटक, चित्रपट, साहित्य या क्षेत्रातही लीलया वावरले. पण, गाण्याचा रसिक म्हणून मी त्यांना जास्त ओळखतो. हा माणूस कोणत्याही घराण्याचे गाणे तल्लीन होऊन व जाणकारीने ऐकायचा आस्वाद घ्यायचा. नवी गोष्ट शिकण्याची त्यांची वृत्ती होती.''

पु.लं.चे टपाल तिकिट प्रकाशित करून आपण त्यांना गुरुदक्षिणाच दिली, असे प्रमोद महाजन यांनी सांगितले. १९७१मध्ये पुण्यातच वृत्तपत्रविद्या अभ्यासक्रमाला पु.ल. 'रेडिओ जर्नालिझम' शिकवत असत. त्यावेळी आपण त्यांचे विद्यार्थी होतो, अशी आठवण श्री. महाजन यांनी सांगितली. पु.लं.सारखी ऋषितुल्य माणसे राजकारणात नसतात. चुकलेल्यांचा कान धरण्याचा अधिकार समाजाने अशा ऋषितुल्य माणसांना दिलेला असतो. त्यांनी कान धरल्यावर राजकारणातील माणसांनी ही आपल्याला मिळालेली सुधारण्याची संधी मानायला हवी, असेही त्यांनी सांगितले.

हे टपाल तिकीट व आजच्या कार्यक्रमाची ध्वनिचित्रफीत पार्ले येथील संग्रहालयात ठेवण्यात यावी, अशी इच्छा सुनीताबाईंनी व्यक्त केली. ही ध्वनिचित्रफीत उपलब्ध करून दिली जाईल, असे श्री.महाजन यांनी सांगितले. पु.ल.देशपांडे यांच्या टपाल तिकीट प्रकाशन समारंभाची ध्वनिचित्रफीत पार्ले येथील पु.ल.देशपांडे संग्रहालयात ठेवण्यात येणार आहे.

येत्या काही दिवसात ब्रिजलाल बियाणी (२२जून), अण्णाभाऊ साठे (१ ऑगस्ट), आनंदऋषीजी महाराज व विठ्ठलराव विखे पाटील (९ ऑगस्ट), दादासाहेब गायकवाड (१५ ऑक्टोबर) यांची टपाल तिकिटे प्रकाशित करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. नागपूर शहराला तीनशे वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्या शहराचे व संत तुकाराम महाराजांचे अशीही दोन तिकिटे प्रकाशित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**मराठीत कमी गुणांमुळे गुणवत्ता यादीच्या बाहेर**

इतर विषयात चांगले गुण असूनही, फक्त मराठीत अनुत्तीर्ण झालेला प्रज्वल महात्मे गुणपडताळीनंतर ज्याप्रमाणे दहावीत राज्यात पहिला आला, तसाच काहीसा प्रकार अंबाजोगाईतही झाला असून, मराठीत कमी गुण पडल्याने अनेक विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीपासून वंचित राहावे लागल्याची तक्रार आहे. दहावीच्या निकालाची शिक्षण मंडळाने उडविलेली फटफजिती हा राज्यातील सर्वच भागातील पालकवर्गात चर्चेचा विषय झाला. सर्व विषयात ९५पेक्षा अधिक गुण

मिळविलेल्या प्रज्वल महात्मेला मराठीत २४ गुण देण्याचा 'पराक्रम' नागपूर बोर्डाने केला. दुसऱ्याच दिवशी पुनर्तपासणीत त्याचे ९४ गुण होऊन तो राज्यात पहिला आला. नागपूर शिक्षण मंडळाचा हा प्रकार शिक्षण क्षेत्राला बदनामीकारक ठरला. राज्य शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत शहरातील उर्दू माध्यमाच्या एका परीक्षा केंद्रावरून दहावीच्या विद्यार्थ्यांना बाकी विषयात ९० ते ९५ टक्के गुण असतानाही केवळ मराठीत कमी गुण पडल्याने गुणवत्ता यादीपासून वंचित राहावी लागल्याची तक्रार अनेक पालकांनी केली आहे. या केंद्रावरून परीक्षा दिलेला हिमांशू सरदेशपांडे ७५० पैकी ६६३ गुण, वैभव तिडके ६४६, शीतल सोमाणी ६३४, वैभव विडेकर ५९८, स्मिता विरागकर ५९२ गुण मिळाले आहेत. या पाचही विद्यार्थ्यांना इतर विषयांच्या तुलनेत मराठीत २५ ते ३० गुणांची तफावत आढळून आली. या विद्यार्थ्यांना राज्यात मराठी विषयातील गुणपडताळणीनंतर राज्यात पहिल्या आलेल्या प्रज्वल महात्मे प्रमाणे आपल्यावर अन्याय झाल्याचे जाणवते आहे. मराठीच्या फेर गुणपडताळणीनंतर आपण गुणवत्ता यादीत येऊ, असा आत्मविश्वास त्यांना असून, तशा प्रकारचे रीतसर अर्जही बोर्डाकडे केले आहेत.

## साने गुरुजींचे विस्तृत चरित्र प्रथमच हिंदीत येणार

आपले सारे आयुष्य राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी व स्वातंत्र्यानंतर समाजसुधारणेसाठी अर्पण करणाऱ्या साने गुरुजींची महती मराठी भाषिकांपुरतीच मर्यादित न राहता देशभरातील नागरिकांपर्यंत पोचावी, या उद्देशाने त्यांच विस्तृत चरित्र आता हिंदी भाषेतूनही प्रकाशित होणार आहे. खानदेशातील ज्येष्ठ अभ्यासक डॉ.विश्वास पाटील यांनी तीन खंडांत हे चरित्र लिहिण्याचे काम हाती घेतले आहे.

हा ग्रंथ गुरुजींच्या जयंतीदिनी, म्हणजे २४ डिसेंबरला प्रकाशित करण्याचा मनोदय आहे.

साने गुरुजींचा परिचय साऱ्या महाराष्ट्राला आहे. त्यांच्या साहित्य व वैचारिकतेवर आजपर्यंत शंभरावर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. गुरुजींचे विस्तृत चरित्र राजा मंगळवेढेकर यांनी 'साने गुरुजींची जीवनगाथा' या ग्रंथात मांडले आहे. परंतु हे सारे लेखन मराठी भाषेतच आहे. गुरुजींच्या 'भारतीय संस्कृती' व 'श्यामची आई' या पुस्तकांचे हिंदी आणि इंग्रजीतून अनुवाद झाले आहेत. तथापि त्यांचे विस्तृत चरित्र अद्याप हिंदी अथवा इतर भाषांत प्रकाशित झालेले नाही. 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे'अशी साऱ्या मानवजातीला शिकवण देणाऱ्या साने गुरुजींचे विचार महाराष्ट्राबाहेर फारसे पसरू शकले नाहीत, याची खंत आजही गुरुजींच्या अनेक 'धडपडणाऱ्या मुलांना' आहे.

डॉ.पाटील हे गुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलांपैकी एक आहेत. महात्मा गांधी व साने गुरुजी हे त्यांचे अभ्यासाचे प्रमुख विषय आहेत. आता त्यांनी साने गुरुजींचे विस्तृत चरित्र हिंदीतून लिहिण्याचे काम हाती घेतले आहे. धुळे येथील आंतरभारती अध्ययन आणि अनुसंधान केंद्रातर्फे या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. 'अमृतपुत्र साने गुरुजी' हे या ग्रंथाचे शीर्षक आहे.

## कलाकृती नव्हे; भोवतालचे वातावरण दुर्बोध : ग्रेस

''कोणतीही कलाकृती दुर्बोध नसते, भोवतालचे वातावरण दुर्बोध असते''असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी ग्रेस यांनी पुणे येथे केले. ''माझ्याइतकी सुबोध कविता कोणीही लिहिली नाही'' असेही ते म्हणाले.

अल्फा दूरचित्रवाणीच्या 'नक्षत्रांचे देणे' या कार्यक्रमातंर्गत ग्रेस यांच्या कवितांवर आधारित 'साजणवेळा' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. सुभाष अवचट, रामदास भटकळ, आनंद मोडक यांनी ग्रेस यांच्या कवितांविषयी व्यक्त केलेली मते दृक्‌श्राव्य स्वरूपात दाखविण्यात आली.

ग्रेस म्हणाले, ''प्रत्येक माणूस हा कलाकार आहे, हे खरे नाही. कलावंत हा उपजत असतो. विशेष व्यक्तींच्या ठायीच कला वास करते; मात्र कलाकाराची कोणतीही कलाकृती दुर्बोध नसते, मात्र सभोवतालच्या दुर्बोध वास्तवामुळे ती रसिकांपर्यंत पोचत नाही, यात कलाकाराचा काय दोष? वास्तवाला दुर्बोध म्हणून त्याला मी हिणवत नाही. रसिकांनी कलाकृतीवर प्रेम केले नाही तरी चालेल; पण ती समजावूनच घ्यायची नाही, हे योग्य नाही. ईश्वराची कृपा ही माझ्या जगण्याची उर्मी आहे. कविता स्फुरते तेव्हा भानामतीची लागण झालेल्या जुन्या घरासारखी माझी अवस्था होते. शरीरातील हाडे न् हाडे खिळखिळू लागतात. निर्मितीपूर्वी व निर्मितीनंतर दरम्यानच्या अवस्थेच्या अनुभूतीत कलावंत प्रामुख्याने जगत असतो''

माधुरी पुरंदरे, चंद्रकांत काळे व मुकुंद फणसळकर यांनी ग्रेस यांच्या कविता सादर केल्या.

## सांस्कृतिक दहशतवादाविरुद्धचा जाहीरनामा म्हणजे जोहड

सांस्कृतिक दहशतवादाविरुद्ध लढण्याचा जाहीरनामा म्हणजे 'जोहड' कादंबरी असल्याचे प्रतिपादन 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित यांनी सोलापूर येथे केले.

जनजागृतीचे काम करणारे राजस्थानमधील डॉ.राजेंद्रसिंह यांच्या जीवनसंघर्षावर आधारित सुरेखा शहा यांनी लिहिलेल्या 'जोहड'कादंबरीचे प्रकाशन दीक्षित यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी निर्मलकुमार फडकुले होते. उद्योगपती मुकुंदराव किर्लोस्कर, 'सत्याग्रही'चे संपादक डॉ. कुमार सप्तर्षी, विद्युल्लता शहा, सुमेरू प्रकाशनाचे संचालक श्रेणिक अन्नदाते उपस्थित होते.

डॉ. फडकुले म्हणाले,''मराठी कादंबरीचा कस व कक्षा वाढविणारी 'जोहड'कादंबरी आहे. ही कादंबरी कादंबरीच्या सांकेतिक कल्पनांना छेद देते.''

डॉ.सप्तर्षी म्हणाले,'' 'जोहड' ला वाचनीयता आहे. माणूस जिवंत असताना त्याचे काम सुरू असताना कादंबरी लिहिणे हे अवघड काम आहे; परंतु सुरेखा शहा यांनी ते साधले आहे.'' सुरेखा शहा म्हणाल्या,''माझ्या लेखनप्रवासातील ही आगळीवेगळी कादंबरी आहे. राजेंद्रसिंह यांच्यावर सर्वात आधी मराठीमध्ये कादंबरी प्रकाशित झाली, ही अभिमानाची गोष्ट आहे.''

## 'मराठी रसिकाच्या वाङ्‌मयीन जाणिवा शांताबाईंनी समृद्ध केल्या'

आपल्या पूर्वग्रहरहित निकोप वाङ्‌मयीन दृष्टीने मराठी रसिकांच्या जाणिवा शांताबाई शेळके यांनी समृद्ध केल्या. शांताबाईंच्या निधनाने महाराष्ट्राची संस्कृतिक हानी झाली, या शब्दांत महाराष्ट्र साहित्य परिषद व अन्य संस्थांनी शांताबाई शेळके यांना श्रद्धांजली वाहिली.

महाराष्ट्राच्या देव्हाऱ्यातून शांता-दुर्गा निघून गेल्या, या शब्दांत कवयित्री डॉ.अरुणा ढेरे यांनी शान्ताबाई शेळके व दुर्गाबाई भागवत यांच्या निधनाचे दु:ख व्यक्त केले. विश्राम बेडेकर, मालतीबाई बेडेकर, पु.ल.देशपांडे, इंदिरा संत, व्यंकटेश माडगूळकर, यांच्या सारखी माणसे अजूनही हवी असतानाच निघून गेली. या पिढीजवळची निष्ठा, वाङ्‌मय उपासनेची श्रद्धा, गांभीर्य व साधना मोठी होती, असे त्यांनी सांगितले.

पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ.नागनाथ कोत्तापल्ले म्हणाले ''आपली

रसिकता पणाला लावून त्यांनी नव्या कवितेचाही आस्वाद घेतला व जुन्या कवितेचे सौंदर्यही समजावून सांगितले.''

कोणतेही संकुचितपणाचे कुंपण नसलेल्या अभिजात रसिकतेतून शान्ताबाईंनी साहित्यावार प्रेम कल्याचे बनहट्टी यांनी सांगितले. शान्ताबाईंच्या वाङ्मयीन निष्ठा पारदर्शक व निष्कलंक होत्या, असे ज्येष्ठ कादंबरीकार शिवाजी सावंत यांनी सांगितले. शान्ताबाईंच्या प्रांजळ, निरागस रसिकपणाचा उल्लेख महापौर दीप्ती चौधरी यांनीही केला.

संस्कृत साहित्याचे अभ्यासक डॉ.मो.गो.धडफळे, कवयित्री डॉ.नीलिमा गुंडी, डॉ.कल्याणी दिवेकर, रतनलाल सोनग्रा, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार, श्री देहू-आळंदी क्षेत्र विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष विश्वनाथ कराड, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष शेणई, पुणे नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष म.श्री.दीक्षित, 'संवाद'चे सुनील महाजन, रंगतसंगत प्रतिष्ठानच्या प्रतिभा आडकर, मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठानचे प्रवीण वाळिंबे, गीतांजली हट्टंगडी, माधवी गुहागरकर, जयंत भिडे व मधुसूदन घाणेकर यांनी श्रद्धांजली वाहिली.

**''माणसाच्या मनाला भिडणाची ताकद व.पु.काळे यांच्या लेखनात होती**

मराठी माणसाचे मन, त्यांच्या आकांक्षा त्यांच्या कथांमध्ये प्रत्ययाला येत होत्या.'' असे मत ज्येष्ठ कादंबरीकार शिवाजी सावंत यांनी आज येथे व्यक्त केले.

व.पु.काळे यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त व.पु.काळे स्मृती प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. ज्येष्ठ समीक्षक सुरेशचंद्र नाडकर्णी या वेळी उपस्थित होते.

सावंत म्हणाले,''व.पुं.ची निरीक्षण शक्ती प्रचंड होती. त्यांच्या लेखनात जिवंतपणा होता म्हणून लाखो मराठी रसिकांनी त्यांना डोक्यावर घेतले.''

''माणसावर मनापासून प्रेम करणारे आणि सौंदर्यदृष्टी असणारे व.पु. माझे जवळचे मित्र होते. सामान्य माणसापासून बेगम अख्तरपर्यंतच्या सर्व प्रकारच्या गप्पा त्यांच्यासोबत रंगत होत्या'' असे ज्येष्ठ समीक्षक नाडकर्णी म्हणाले.

व.पुं.चे मित्र डॉ.हिमालय पंतवैद्य यांनी त्यांच्या अनेक आठवणी सांगितल्या. या वेळी सावंत यांच्या हस्ते व.पुं.च्या 'संवादिनी', 'स्वर', आणि 'इंटिमेट' या तीन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसने ही पुस्तके प्रकाशित केली आहेत.

या प्रकाशन संस्थेचे अनिल मेहता व सुनील मेहता, महाराष्ट्र एक्झिब्युटर ट्रस्टी कंपनीच्या भाग्यश्री भिडे या वेळी उपस्थित होत्या.

व.पुं.च्या स्मृतीनिमित्त घेण्यात आलेल्या कथाकथन स्पर्धेतील प्रणिता तितर, दुर्धरी कोमल (प्रथम क्रमांक), अपूर्णा इनामदार (द्वितीय) व मिनी दत्तात्रय प्रभू (तृतीय) यांना या वेळी गौरविण्यात आले. प्रास्ताविक भाषण प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिरीष रायरीकर यांनी केले. सोनाली साठे - श्रीखंडे यांनी सूत्रसंचालन केले. राजन चांदोरकर यांनी आभार मानले.





# कवितेची सदाबहार मैफल

**अनिल मेहता**

माझ्या पत्नीला मराठी गाणी ऐकण्याची खूप आवड होती. आकाशवाणीवर बरेचदा शान्ताबाईंची गाणी लागायची. एके दिवशी 'तोच चंद्रमा नभात'हे भावगीत लागलं होतं. मी ते मनापासून ऐकलं अन् मला ते खूपच आवडलं. त्यावेळी मी नुकताच प्रकाशनक्षेत्रात उतरलो होतो. शान्ताबाईंचा एखादा कवितासंग्रह प्रकाशित करावा, असं मला वाटलं. काही कामानिमित्त मी आणि डॉ.आनंद यादव मुंबईला गेलो होतो; तेव्हा 'साहित्य सहवास'मध्ये शान्ताबाईंची भेट घेतली. मी त्यांच्याकडे प्रकाशनासाठी पुस्तक मागितलं. त्यांनी आनंदानं कबूल केलं. त्यांचा साधा, सरळ, नम्र, निगर्वी, प्रेमळ स्वभाव मला खूपच भावला. आमचे संबंध वाढत राहिले. त्यांची अठरा पुस्तके आम्ही प्रकाशित केली.

एकदा पुण्याच्या आमच्या ऑफिसमध्ये रात्रीच्या वेळी रणजित देसाई आणि माधवीताई आले होते. हळूहळू तेथे वि.स.वाळिंबे, डॉ.आनंद यादव, ग.वा.बेहेरे, शंकर पाटील, बाबा पाटील अशी मैफल जमत, वाढत गेली. मध्येच काही कारणाने शान्ताबाईंचा फोन आला. मी त्यांनाही बोलावले. कोणतेही आढेवेढे न घेता त्या लगेच आल्या. मग गप्पांची, कवितांची ती मैफल उत्तरोत्तर रंगतच गेली. रणजित देसाई, ग.वा.बेहेरे यांनी तेव्हा एक गंमत केली. शांताबाईंच्या कवितांच्या सुरवातीच्या दोन-तीन ओळी ते म्हणायचे. पुढचा भाग विसरला आहे, असं दाखवायचे. लगेच शान्ताबाई ती पूर्ण कविता म्हणून दाखवायच्या. या अनोख्या खेळामुळे पहाटे साडेतीनपर्यंत रंगलेली ती मैफल चांगलीच लक्षात राहिली.

त्या एकपाठी होत्या. कोणत्याही कवितेचा संदर्भ हवा असल्यास त्यांना खुशाल फोन करावा. तातडीनं हवी असलेली सगळी माहिती मिळायची. गेली ५०-५५ वर्षे शांताबाई कविता लिहित होत्या. इतर अनेक साहित्य प्रकारात त्यांनी मुशाफिरी केली, पण आत्मनिष्ठ कविता हाच त्यांच्या आवडीचा प्रांत होता. त्यांच्या कवितेत सहजता आणि प्रसन्नता होती. त्यांची अर्थवाही कविता समजावून घेण्यासाठी रसिकाला कधी तिच्याशी झटापट करावी लागली नाही. त्यांच्या कविता

कोणताच अभिनिवेष न घेता, प्रेषिताचा आव न आणता हृदयाच्या तळातून सहजतेनं वाहत येतात- एखाद्या निर्मळ झऱ्याप्रमाणे! त्यांच्या कवितेत मोकळा काहीसा धीट शृंगार असला तरी नव्याने येऊ पाहाणारा लिंगसंप्रदाय अपवादानेही भेटत नाही. त्यांची कविता म्हणजे केवळ सरळ, शुद्ध, निरागस आत्माविष्कार असतो. त्यांच्या कवितेची ही वैशिष्ट्यं मला मनापासून आवडतात. म्हणूनच मी त्यांना कालिदासाच्या 'मेघदूता'चे रूपांतर करण्याची विनंती केली. त्या म्हणाल्या, 'कुसुमाग्रज, सी.डी.देशमुख अशा मोठ्या लेखकांनी त्याचं रूपांतर केलं आहे. मी केलं तर ते पुस्तक खपेल का?' पण मी आग्रह सोडला नाही. त्यांनी केलेलं रूपांतर नक्कीच वेगळं असणार, याची मला खात्री होती. माझा विश्वास खरा ठरला. या पुस्तकाच्या तीन आवृत्त्या निघाल्या.

इंग्रजी साहित्याचं त्यांचं वाचन प्रचंड होतं. कुठल्या तरी इंग्रजी पुस्तकाचा माझ्यासाठी अनुवाद करण्यासाठी लकडा लावला होता. मी त्यांना लीव्ह उलमनचं 'चेंजिंग'हे आत्मचरित्र दिलं. त्यांनी अनुवाद करण्याचं कबूल केलं. पण दुर्दैवानं त्यांना ते करता आलं नाही. तरीही त्याचा अनुवाद त्यांनी आवर्जून तपासून दिला; तो आवडल्याचं आवर्जून सांगितलं. 'लिटल् वुमेन'या पुस्तकाचा त्यांनी केलेला 'चौघीजणी'हा अनुवाद खूप गाजला. या पुस्तकाच्या पाच आवृत्त्या निघाल्या. आजही हे पुस्तक मोठ्या प्रमाणावर वाचलं जातं.

एकदा गप्पा मारताना मी त्यांना 'तोच चंद्रमा नभात' हे गीत तुम्हाला कसं सुचलं?' असं विचारलं. त्या म्हणाल्या,'अरे, हे तर संस्कृतमधल्या एका श्लोकाचं भाषांतर आहे.' त्यांनी संस्कृत काव्यातील अनेक रचनांचा आधार घेऊन कविता केल्या आहेत.

मराठी कवितेच्या पूर्व परंपरेशी असलेलं नातं त्यांनी जिवापाड जपलं. तरी त्यांनी नव्या कवितेशीही सुजाण रसिकपणाने अनुबंध जोडला होता. तिच्यातली काही वैशिष्ट्यं आत्मसात केली होती. भाषेची नवी वळणं, आशयसंपृक्तता, वेगळी प्रतिमासृष्टी हे सारं त्यांच्या कवितेत मुरलेलं होतं. जुने-नवे काव्यसंस्कार घेतलेली त्यांची कविताही 'त्यांचीच' राहिली. साधी, सरळ, सहजपणे मनोगत सांगणारी, रसिकांशी मोकळेपणाने हितगुज करणारी, जिव्हाळ्यानं ओथंबलेली!

नवोदितांशी त्यांचं नातं तितक्याच सहजतेचं होतं. त्यांना त्या प्रोत्साहन देत असत.

अमेरिकेत सॅन होजे येथे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संमेलनात आशा भोसले यांनी त्यांची 'रेशमाच्या रेघांनी'ही लावणी सादर केली. ही रचना शान्ताबाईंची आहे, हे कळल्यावर मी त्यांना तिथूनच फोन केला. त्यांच्या लावण्या, गौळणी एकत्रित करून ठेवायला सांगितलं. मी हे पुस्तक प्रकाशित करणार आहे, असंही सांगितलं. त्याप्रमाणे त्यांनी ते दिलंही. तोच 'रेशीमरेघा' हा संग्रह आम्ही नुकताच प्रकाशित केला आहे.

शान्ताबाईंनी विपुल गीतलेखन केलं आहे. चित्रपट, नाटकं, ध्वनिमुद्रिका, ध्वनिफित अशा माध्यमातून त्यांची अनेक गीतं लोकप्रिय झाली आहेत. त्या सध्याच्या आघाडीच्या गीतकार आहेत. गीतासाठी त्यांनी विविध रचनाबंध हाताळले आहेत. त्याचप्रमाणे त्यातील आशयाची विविधता विस्मयकारक रीतीने सामोरी येते.

शान्ताबाईंचं आणखी एक वैशिष्ट्य होतं. त्या रसिक, दर्दी खवैया होत्या. छान, चमचमीत खाणं त्यांना आवडायचं. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड जाहीर झाली. फोन, भेटायला येणारे पाहुणे, पुष्पगुच्छ अशा गर्दीत त्या हरवून गेल्या. त्यांना शब्दश: खायलाही वेळ मिळाला नव्हता. बातमी समजल्यावर मी गरमागरम बटाटेवडे, सँडविचेस आणि सुकामेवा घेऊन गेलो. त्या इतक्या खूश झाल्या की बस! त्या वड्यांची चव आठवली की परवापरवापर्यंत त्या सुनीलला फोन करून वडे पाठवायला सांगत असत. मग ऑफिसमध्ये धावपळ होत असे. वडे त्यांच्या घरी पोचवले जात.



शान्ताबाई कोल्हापुरात दोन-तीन वेळा समारंभासाठी आल्या होत्या. सौ.लीना सोहोनी यांनी अनुवादित केलेल्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ त्यापैकी एक होता. समारंभात त्यांनी सौ.सोहोनी यांचं खूप कौतुक केलं. त्यांना प्रोत्साहन दिलं. नवोदितांच्या चांगल्या गोष्टींना आवर्जून दाद देणं, किंबहुना कोणाच्याही चांगल्या गोष्टी आवडल्या तर मोठ्या मनानं ते सांगणं, ही त्यांची खासियत होती.

माझ्या कन्येच्या -चि.शर्मिलाच्या -मंगलाक्षता करून द्याल का असं मी शांताबाईंना जरा भीत भीत विचारलं. एवढ्या मोठ्या कवयित्रीनं मंगलाक्षता लिहिणं म्हणजे जरा मला संकोचच वाटला. पण त्यांनी जराही आढेवेढे न घेता सुंदर मंगलाक्षता करून दिल्या.

कोल्हापुरात आल्या की त्या आमच्या घरी आवर्जून यायच्या. माझ्या पत्नीशी त्यांची चांगली मैत्री जमली होती. माझ्या पत्नीचा आवाज चांगला होता. शान्ताबाईंच्या कविता ती त्यांनाच म्हणून दाखवत असे. तिच्या निधनानंतर शान्ताबाईंनी मला आवर्जून पत्र लिहिलं. एकटेपणा कसा स्वीकारावा, हे त्या पत्रात त्यांनी फार सुंदर रीतीनं समजावून सांगितलं होतं.


निस्सीम, निरामय प्रेमभाव हे त्यांचं प्रथमदर्शनी जाणवणारं वैशिष्ट्य होतं. आम्ही प्रकाशित केलेल्या जवळजवळ प्रत्येक पुस्तकात 'माझे तरुण उत्साही प्रकाशक मित्र- सुनील मेहता'असा उल्लेख त्यांनी आवर्जून केला आहे. एखाद्या पुस्तकातील एखादी गोष्ट त्यांना रुचली नाही तरी त्याबाबत नाराजी व्यक्त करणं त्यांना जड जाई.

अशा या दिलदार साध्या निगर्वी शांताबाई आमच्या मेहता पब्लिशिंग हाऊसच्या परिवारातून निघून गेल्या याचं दु:ख मला आणि सुनिलला तर आहेच; पण आमच्या स्टाफ मधल्या सर्वांनाच वाईट वाटत आहे.

त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीजवळ त्यांच्या सुंदर आठवणींचे मधुघट आहेत. म्हणूनच त्यांच्या या ओळी आज आठवतात,

असेन मी, नसेन मी तरी असेल गीत हे
फुलाफुलात येथल्या उद्या हसेल गीत हे

स्वये मनात जागते न सूर ताल मागते
अबोल राहुनी स्वत: अबोध गुज सांगते
तृणात फूलपाखरू तसे बसेल गीत हे
फुलाफुलात येथल्या उद्या हसेल गीत हे




पुस्तक परिचय

# बिझिनेस लेजंडस्

लेखिका : गीता पिरामल
अनुवाद : अशोक जैन

**भारताच्या औद्योगिक प्रगतीचे प्रमुख शिल्पकार**

'बिझिनेस महाराजे' या पुस्तकाद्वारे गीता पिरामल यांनी काही अग्रगण्य उद्योगपतींच्या कार्यशैलीचे, जीवनशैलीचे व मूल्यप्रणालीचे एक वेधक रूप वाचकांसामोर ठेवले. पीएचडीसाठी गीता पिरामल यांनी ८ वर्षे खपून मुंबईच्या आर्थिक व औद्योगिक विकासाचा इतिहास तयार करण्याचा प्रयत्न केला. तो प्रबंध त्यांनी प्रसिद्ध केला नाही. परंतु त्या निमित्ताने अग्रगण्य भारतीय औद्योगिक घराण्यांबद्दलचे त्यांचे कुतूहल जागे झाले आणि त्यातून काही धाडशी व नशीबवान उद्यागपतींच्या कर्तृत्वाचे आपल्याला जाणवलेले विशेष 'बिझिनेस महाराजे'मध्ये त्यांनी चुरचुरीत शैलीत टिवले. रतन टाटा, आदित्य विक्रम बिर्ला, धीरूभाई अंबानी, राहुलकुमार बजाज, रमाप्रसाद गोएन्का, ब्रिजमोहन खैतान, भरत व विजय शहा या सात उद्योगपतींचा समावेश त्यात होता.

'बिझिनेस महाराजे'च्या प्रकाशनाच्या वेळी सूत्रसंचालक टिटू अहलुवालिया यांनी गोएन्कांना विचारले, ''तुमच्या उद्योगसमूहाचे भवितव्य काय?'' त्यावेळी गोएन्कांनी जे उत्तर दिले, त्यातून बिझिनेस लेजंडस या पुस्तकाचा जन्म झाला. गोएन्कांचे उत्तर होते, ''पुढच्या दहा वर्षांचा विचार करायचा झाला तरी स्वप्ने बाळगणारी व दूरदृष्टी असणारी व्यक्ती हवी. गेल्या काही दशकात भारतात जेआरडी टाटा, घनश्यामदास बिर्ला आणि धीरूभाई अंबानी या औद्योगिक क्षेत्रातील तीन स्वप्नाळू व्यक्ती होत्या. **तुमच्याजवळ स्वप्नं बाळगणारा कोणी नसेल तर तुमच्याकडे दूरदृष्टी असणाराही कोणी असत नाही. मी स्वप्नाळू आहे, पण माझ्याजवळ दूरदृष्टी नाही. त्यामुळे माझ्यासमोर मोठाच प्रश्न आहे.**''

गोएन्का यांच्या या उत्तरामुळे गीता पिरामल यांना जी.डी.बिर्ला, वालचंद हिराचंद, कस्तुरभाई लालभाई आणि जेआरडी टाटा या चौघा स्वप्नदृष्ट्यांच्या कार्यकर्तृत्वाची नव्याने छाननी करावीशी वाटली; आणि या व्यक्ती औद्योगिक क्षेत्रात आख्यायिका व दंतकथा यांचा विषय कशा बनल्या याचा शोध घ्यावासा वाटला.

या चौघांचीही उद्योग-शैली स्वतंत्र होती; ब्रिटिश सत्ता प्रभावशाली असताना भारतात उद्योगधंद्यांची उभारणी करण्याच्या मार्गात अनेक अडचणी होत्या. परंतु या चौघांनी त्या सर्व अडचणींना तोंड देऊन आपापल्या उद्योगांची उभारणी भक्कम पायावर व्हावी यासाठी प्रयत्नांची



## पुस्तकाची खास वैशिष्टये...

- भारतातील चार प्रमुख उद्योगपतींच्या कार्यकर्तृत्वाचे विस्मयकारक चित्रण.
- प्रत्येक उद्योगपतींच्या कार्यशैलीतील आणि जीवनशैलीतील वेगळेपणा.
- यशाचे आडाखे आणि अपयशाचे तडाखे
- उद्योगातील भरभराट हा अपघात नव्हे, त्यामागे अचूक निर्णयशक्ती व धडाडी असते.

शर्थ केली आणि एकेका क्षेत्रात पाय रोवत वेगवेगळ्या क्षेत्रात मुसंडी मारण्याचा धडाका चालू ठेवला. गीता पिरामल यांना या चौघांच्या काही कागदपत्रांची पाहणी करता आली; त्यामुळेही त्यांच्या या लेखनाला पुराव्यांचा आधार आहे. आपापले औद्योगिक साम्राज्य उभे करताना या चौघांनी व्यवस्थापन, कामगार, स्पर्धा, मालाचा दर्जा, वितरण वगैरे सर्वच बाबतीत धडाडीने नवनवे ठोकताळे बसवले आणि यशही मिळवले. त्यांच्या औद्योगिक साम्राज्यांची उभारणी ही दीर्घकालीन परिश्रमाची परिणती आहे.

घनश्यामदास (जी.डी.) बिर्ला हे मूळ पिलानीचे. १९०० सालापासून त्यांचे वडील मुंबईत कापसाचा व्यापार करीत. १९०३ मध्ये माटुंगा भागात दोन मजली घर त्यांनी बांधले आणि व्यवसायात मदतीसाठी आपल्या तिसऱ्या क्रमांकाच्या मुलाला -घनश्यामला -मुंबईला बोलावून घेतले. इंग्रजी शिकवण्यासाठी शिकवणी ठेवली. वयाच्या अकराव्या वर्षी दुर्गा सोमाणी यांच्याशी लग्न. १९०९ मध्ये प्रथम पुत्र लक्ष्मीनिवासचा जन्म. त्यानंतर अल्पावधीतच दुर्गाचे निधन. १९१०मध्ये, वयाच्या सोळाव्या वर्षी घनश्यामदास बिर्ला यांनी स्वत:चा वेगळा व्सवसाय कलकत्याला सुरू केला. लोकमान्य टिळकांची व्याख्याने ऐकून जीडी प्रभावित झाले; आणि क्रांतिकारकांना शस्त्रास्त्रे मिळवण्यास मदत करू लागले. आपल्या गोडाऊनमध्ये शस्त्रास्त्रांचा साठा करण्यास त्यांनी जागा दिली. पोलिसांनी धाड घातली आणि जीडींना पकडण्यासाठी पोलिसांनी जाळे पसरले. जीडींनी पळ काढून साधूच्या वेषात मदुरा-नाथद्वारा अशी भटकंती केली. पुढे वॉरंट रद्द झाले, आणि वर्षाने जीडी कलकत्त्याला परतले. स्वातंत्र्याबद्दल त्यांना आच होती पण सशस्त्र उठावाची कल्पना त्यांना व्यावहारिक वाटत नव्हती. त्यामुळे पुढे त्यांना गांधीजींचा अहिंसक मार्ग अधिक रास्त वाटला, आणि गांधीजींशी त्यांचा चांगला स्नेह जमला.

ज्यूट निर्यात व्यवसायात जम बसवण्यासाठी जीडींना त्यांचे सासरे महादेव सोमाणी यांची मदत झाली. युद्धकाळात कलकत्त्यात वाळूसाठी ज्यूटच्या पोत्यांना मागणी एकदम वाढली आणि

ज्यूटचे शेअर्स वधारले. बिर्लांनी लंडनमध्ये आपले ऑफिस उघडले. भारतीय मालकीच्या कंपनीनं लंडनमध्ये निर्यात कार्यालय उघडणे हे धाडस प्रथम बिर्लांनीच केले. १९२०पर्यंत ज्यूटच्या तीन प्रमुख निर्यातदारांमध्ये जीडींचे नाव घेतले जाऊ लागले. बिर्लांचे उत्पन्न २० लाखांवरून ८० लाखावार पोचले. कच्च्या तागापासून पोती बनवण्याचं तंत्रज्ञान हस्तगत करून जास्त कमाई करता येईल हे लक्षात आल्यावर त्यांनी हुकमचंद ज्यूट आणि बिर्ला ज्यूट गिरण्या सुरू केल्या.(१९२०)

ब्रिटिशांशी स्पर्धा करण्याच्या या कृतीबद्दल इंपीरिअल बँकेने कर्ज नाकारले, ब्रिटिश निर्यातदारांनीही असहकार दाखवला. 'तुम्ही व्यापार करा. गिरण्या चालवण्याच्या भानगडीत पडू नका.' म्हणून बिर्लांनी गिरणीसाठी खरेदी केलेल्या जागेशेजारच्या जमिनी अँड्र्यू यूल या कंपनीने खरेदी करून त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश व्यापारी ज्यूट उद्योगात जीडींचा प्रवेश ही गोष्ट सहन करू शकत नव्हते. त्यांनी मारवाडी समाजावरच हल्ले सुरू केले. परंतु जीडींनी नेटाने त्यांना टक्कर देऊन आपल्या व्यवस्थापन कौशल्याने उत्तम उत्पादन करून लक्षावधींचा नफा मिळवला.

त्यावेळी त्यांनी व्यवसायाची तीन सूत्रे ठरवली व ती पुढेही पाळली. १) निर्णय घेतला की त्याची लगेच अंमलबजावणी करायची. २) जुनी गिरणी खरेदी करण्यापेक्षा नवी गिरणी उभारणं हे अधिक सोयीचं असतं. ३) पदवीधरांपेक्षा पदवी नसलेल्या कर्मचाऱ्यांना भरती करावे; त्यांना आरंभापासून प्राधान्य द्यायचे. कारखाने ताब्यात घेण्याऐवजी नव्याने उभारावेत हे सूत्र आजही पाळले जाते. (जीडींचे नातू आदित्य बिर्ला यांनी वीस वर्षात वेगवेगळ्या देशात ७० कारखाने उभारले.)

१९२२मध्ये ग्वाल्हेरचे राजे शिंदे यांच्या आमंत्रणावरून जीडींनी ग्वाल्हेरला जियाजीराव कॉटन मिल्सचा शुभारंभ केला. भावंडांत जीडींचा तिसरा नंबर होता, परंतु अशा धाडसी व्यवहारांमुळे जीडी हेच कुटुंबाचे नेते ठरले. १९२३मध्ये कलकत्त्यात त्यांनी नवा बंगला बांधला. त्यात १९५५पर्यंत त्यांचे वास्तव्य होते. बिर्ला घराण्याचं स्वतंत्र अस्तित्व दाखविणारा तो बंगला होता.

महात्मा गांधींशी जीडींची मैत्री जुळली. १९२७मध्ये जीडींनी हिंदुस्थान टाइम्स हे वृत्तपत्र ताब्यात घेतले. जीडी १९२६मध्ये बनारस गोरखपूर मतदार संघातून श्रीप्रकाशना हरवून असेंब्लीवर निवडून आले. राजकारणात पडल्यावर बिर्लांचे उद्योगाकडे दुर्लक्ष झाले. १९२२ ते १९३१ या नऊ वर्षात बिर्लांनी एकही नवी कंपनी सुरू केली नाही. १९३०मध्ये जीडींनी असेंब्लीचा राजीनामा देऊन पुन्हा कारखान्यांकडे लक्ष देणे सुरू केले. पुढच्या तीन वर्षात त्यांनी ५ नवे साखर कारखाने उभारले. नवनव्या उद्योगात प्रवेश करणे आणि कारखान्याची क्षमता उत्पादनदृष्ट्या प्रचंड ठेवणे हे धोरण त्यांनी ठेवले. भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे साखर उत्पादक म्हणून त्यांनी अल्पावधीत स्थान मिळविले. ज्यूट व कापड गिरण्या यांचा नफा घटत होता, तेव्हा साखरेने हात दिला. १९३६मध्ये ब्रजमोहन या त्यांच्या धाकट्या भावाने ओरिएंट पेपर ही कंपनी सुरू केली. जीडींनी पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर महादेवी खरवा यांच्याशी विवाह केला. कृष्णकुमार (१९१८) व बसंतकुमार (१९२१) अशी दोन मुले झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात बिर्लांच्या उत्पन्नात अवाढव्य वाढ झाली. मोटारी, सायकली, पंखे, रेयॉन, प्लॅस्टिक, प्लायवूड, वनस्पती तेल, बॉलबेअरिंग, नॉनफेरस मेटल, चहा, कोळसा, विमान वाहतूक, बँकिंग- अशा अनेक क्षेत्रात बिर्लांनी



आपले पाय पसरले. १९५८पर्यंत १५१ कंपन्यांपर्यंत मजल गेली.

गीता पिरामल यांनी जवाहरलाल नेहरूंचे एक पत्र उद्धृत केले आहे. त्यात नेहरूंनी म्हटले आहे,''माझ्याकडे स्वत:ची मोटार नाही. माझे मेव्हणे रणजित पंडित यांची मोटार मी वापरतो. पण पेट्रोलच्या स्थितीमुळे तेही आता कठीण झालेय. तेव्हा हिंद सायकल वापरण्याचे मी ठरविले आहे. पण ती बाजारात उपलब्ध नाही. ती कोठे मिळेल हे कळवा. (६जानेवारी, १९४२)'' तेव्हा जीडींनी एक नव्हे दोन सायकली नेहरूंना पाठविल्या.

**''महात्मा गांधीजींना दारिद्र्यात राहता यावं यासाठी बिर्लांचे लक्षावधी रुपये खर्च झाले.''** असा शेरा एकदा सरोजिनी नायडू यांनी मारला होता. **''बिर्लांनी सर्वात जास्त गुंतवणूक केली ती महात्मा गांधी यांच्यात.''** असेही म्हणण्यात येते. महात्मा गांधी आणि जीडी बिर्ला यांचे स्नेहसौहार्द हे अलौकिक होते. 'इन दि शॅडो ऑफ द महात्मा'या पुस्तकात जीडींनी गांधींशी झालेला पत्रव्यवहार दिला आहे. पुढे या पत्रांचे चार खंड प्रसिद्ध झाले. ब्रिटिश सरकार आणि महात्मा गांधी यांचे अनधिकृत दूत व दुभाषे म्हणून जीडी काम करीत, असे म्हटले जाते. तेही खरेच आहे. धनिक मारवाडी समाजातील जीडींच्या प्रभावाची उपयुक्तता गांधीजींनी जाणलेली होती आणि जीडींनीही गांधीजींना आर्थिक व अन्य मदत देण्यात कधीही हात आखडता घेतला नाही. जीडी स्वत: देणग्या देत, इतरांनाही देण्यास प्रवृत्त करीत.

जीडी बिर्ला यांचे व नेहरू घराण्याचे संबंध मात्र फारसे आत्मीयतेचे नव्हते. जीडींच्या असेंब्ली निवडणुकीत मोतीलाल नेहरूंनी त्यांच्याविरोधी भूमिका घेतली होती. जवाहरलालजींनी स्वातंत्र्योत्तर काळात बिर्लांच्या संपत्तीची चौकशी करण्यासाठी हजारी कमिशन नेमले. जवाहरलालजींच्या निधनानंतर जीडींनी म्हटले, ''नेहरू हे भावनाप्रधान होते. त्यांच्यासारखी संवेदनशील माणसे ही कार्यक्षम प्रशासक बनू शकत नाहीत.'' या दोघांच्या संबंधातील ताणतणाव दहाव्या प्रकरणात विस्ताराने आलेले आहेत. जीडींनी पुढे म्हटले, ''फक्त एकाच राष्ट्रीय नेत्याने आमच्याकडून पैसे घेतलेले नाहीत, आणि ते म्हणजे जवाहरलालजी.'' जवाहरलालजींच्या भगिनी विजयालक्ष्मी यांनी मात्र बिर्लांकडून प्रचंड रकमा घेतल्या होत्या. जयप्रकाश नारायण यांना जीडींचे खासगी सचिव म्हणून दरमहा वेतन पाठवले जाई. (पृष्ठ१०४)

बिर्लांच्या मालमत्तेची १९८३मध्ये विभागणी झाली. अशोक(८५कोटी), एमपी(२४५कोटी), एलएन-एसके (२००कोटी), केके (३१५कोटी), बीके/एव्ही (१२२०कोटी), जीपी/सीके (६९०कोटी) ही वाटणी स्वत: जीडींनी केली होती. तिच्याबद्दल कुटुंबात बरीच नाराजी राहिली. ११जून १९८३ रोजी जीडी लंडनमध्ये वारले.

जीडी बिर्ला आणि जेआरडी टाटा हे दोघे तसे समकालीन पण दोघांच्या विचारसरणीत, कार्यपद्धतीत, व्यवस्थापन तंत्रात, राजकीय दृष्टिकोनात बराच फरक होता.

जीडी रिकाम्या जागांसाठी कधीही जाहिराती देत नसत. जुन्या संचालकांची मुलं, नातवंडं यांना सहज सामावून घेत. तरुण नवशिक्या पण भरवशाच्या माणसांना प्राधान्य देत. परदेशातील एमबीएपेक्षा भारतीय चार्टर्ड अकाऊंटंटची निवड करीत. बिर्लांकडची नोकरी ही आयुष्यभरची कमिटमेंट असे ते मानत. धंद्यात तोटा म्हणजे आपल्या जमातीचा अपमान असे ते मानत. गलथान कारभार व आळस यामुळे तोटा होतो; त्यांना आपल्याकडे थारा नाही असे ते म्हणत. चांगलं काम करणाऱ्यांना ते जादा वेतन व बढत्या भराभर देत. जादा जबाबदाऱ्या त्यांच्यावर टाकत. मनुष्य

स्वभावाचं व वर्तनप्रक्रियेचं ज्ञान जीडींना अप्रतिम होतं. 'हिंदुस्थान टाइम्स'चे संपादक देवदास गांधी १९५७मध्ये वारले; तेव्हा चौघा जेष्ठ सहसंपादकांना डावलून जीडींनी एका कनिष्ठ सहसंपादकाला हंगामी संपादक नेमले... कारण संभाव्य संपादक दुर्गादास हे त्यावेळी व्हिएन्नाला होते. ज्येष्ठ संपादकांपैकी कोणाला हंगामी संपादक नेमले असते तर नंतर आपली पदावनती झाली असे त्यांना वाटले असते, म्हणून जीडींची ही योजना होती. मनुष्य स्वभावाची पारख त्यांना चांगली होती. (१२२-१२३) आपल्या चांगल्या अधिकाऱ्यांनी निवृत्ती घेऊन स्वत:च्या संस्था सुरू कराव्या या गोष्टीलाही ते उत्तेजन देत. साबू, मंडेलिया, खैतान, मुरारका, हाडा, केसरीवाल वगैरे बिर्लांच्या अधिकाऱ्यांनीही आपापली उपसाम्राज्ये नंतर उभारली. (१२४) दररोज त्यांच्या टेबलावर प्रत्येक कारखान्याचा अहवाल असे. त्यात रोजचा खर्च, उत्पादन, विक्री, उत्पादनाचं वेळापत्रक, यंत्रसामग्रीचा वापर, कच्चा माल, स्टोअर्स, वसुली, प्रत्येक यंत्राचं उत्पादन यांची नोंद असे. (१२७) कारखान्यातील गुंतवणुकीचा २५-३०टक्के भाग ते राखीव निधीत कायम ठेवत. अडचणीच्या काळात त्यामुळे सोय होई.

असे अनेक तपशील गीता पिरामल यांनी या पुस्तकात दिलेले आहेत. जीडी हे एक विसंगतींनी भरलेले व्यक्तिमत्त्व होते असे त्या मानतात. (१३१)

त्यांनी पिलानीला तंत्रज्ञान संस्था काढली. पण आपल्या कोणाही मुलाला पदवीधर केले नाही. पदव्यांवर त्यांचा विश्वास नव्हता. त्यांना उत्तम कपडे, उत्तम फर्निचर आवडे. पण त्यांच्या वैयक्तिक गरजा कमी होत्या. "जीडींना विसरून जा. इतकी वर्षे मी एक भला माणूस बनण्याचा प्रयत्न केला एवढंच लक्षात ठेवा." असे त्यांनी एका मासिकाला दिलेल्या अखेरच्या मुलाखतीत म्हटले होते.

जीडी बिर्लांप्रमाणेच 'बिझिनेस लेजंडस'मध्ये वालचंद हिराचंद दोशी, कस्तुरभाई लालभाई, आणि जेआरडी टाटा यांच्याही कर्तृत्वाचा व व्यक्तित्वाचा इतकाच अंतर्भेदक वेध घेण्यात आलेला आहे.

भारताला औद्योगिक क्षेत्रात स्वतंत्र व सार्वभौम बनविण्याची जिद्द या सर्वांनी बाळगली आणि त्यासाठी लागणारी यंत्रणा उभी केली. आरंभी ब्रिटिश राज्याशी टक्कर त्यांना द्यावी लागली आणि स्वातंत्र्यानंतर समाजवादाच्या अव्यावहारिक कल्पनांनी बहकलेल्या राज्यकर्त्यांच्या आणि नोकरशाहीच्या लायसेन्स परमिटराजशी जुळते घेऊन टिकाव धरून राहिलेल्या आणि उदारीकरणाच्या काळात या दूरदर्शी उद्योगपतींनी निर्माण केलेल्या औद्योगिक पायावरच आपण टिकून राहणार आहोत. म्हणून या उद्योगपतींच्या जीवनाचाही परिचय आपल्याला प्रेरणादायक ठरल्यावाचून राहणार नाही.

**पृष्ठे : ४७४ किंमत : ३००रु. सभासदांना :२२५रु. पोस्टेज :२५रु.**




## बिझिनेस महाराजे

**मूळ लेखिका : गीता पिरामल अनुवाद : अशोक जैन**

भारतातील आठ उद्योगपतींच्या जीवनकार्याची झलक दाखवणारे, त्यांची जणू सजीव शब्दचित्रं रेखाटणारे संग्राह्य पुस्तक


**किंमत : २५०रु. सभासदांना :१८८रु. पोस्टेज :२५रु.**



# जाहिरात

जाहिरात






# रिवणावायली मुंगी

## लेखक : राजन गवस

**ग्रामीण वास्तववादी कथा आणि व्यस्ततावादी कथा यांची जुगलबंदी**

रिवणावायली मुंगी हा राजन गवस यांच्या तेरा कथांचा संग्रह. या कथा १९८१ ते १९९८ दरम्यान सत्यकथा, साप्ताहिक सकाळ, महाराष्ट्र टाइम्स, स्त्री, किर्लोस्कर वगैरे अंकातून आलेल्या आहेत. काही कथा ग्रामीण पार्श्वभूमीवरील आहेत, तर काही व्यस्ततावादी शैलीतल्या आहेत.

ग्रामीण कथांमध्ये त्या त्या भागातील बोलीभाषेचाच निवेदकाने वापर केलेला आहे, आणि ग्रामीण वास्तवाचे भेदक, अस्वस्थ दर्शन घडवले आहे. ग्रामीण मानसिकतेचा आणि समाजजीवनाचा प्रत्ययकारक अनुभव देणाऱ्या या कथा आहेत.

'संप'मधला म्हमईचा तात्या मुंबईच्या कापड गिरण्यांच्या संपामुळे गावी येतो. ''असा कसा आबजटूक आलास रं बाबा?'' म्हणत त्याची म्हातारी पाण्याचा तांब्या त्याच्या हाती देते... घरात थोरला भाऊ शंकर शेती बघतो. मधला हानमू गडहिंग्लजला दुकानात नोकरी करतो. धाकटा पांडू मुंबईत गिरणी कामगार. थोरल्या भावांची लग्नं दहा वर्षांपूर्वी झालेली. पांडूचं दोन महिन्यांपूर्वी. घरात चार गाईगुरं... आधी मुंबईकर म्हणून कौतुक पण दिवस जातात तसा त्याचा रिकामटेकडेपणा घरात सर्वांना खुपू लागतो. शेतावर चल म्हटले तर पांडू हात झटकतो. बायकात धूसफूस सुरू होते. तशात पांडबाची नट्टापट्टा करणारी बायको ही म्हातारीला जराशी खटकायचीच. 'नवरा म्हमईस्नं आल्यापास्नं तर तिच्या वागण्यानं खुळच लावलं.' असे तिला वाटतं. हाजारदा आरशात काय बघती, सारखं म्होरं म्होरं करती नवऱ्याच्या- हिचं बघून थोरल्या दोघीबी कराय लागल्या तर घराचा मांडव व्हायला वेळ लागणार न्हाई अशी झुरणी म्हातारीच्या जीवाला लागते. ''वळू सारखा बसून खातोस आणि हितनं तिथं जायला व्हईना व्हय रं भाड्या'' असं म्हणत थोरली आपल्या पोराला एकदा बडवते... घरात भांडणं सुरू होतात. पंच येतात. सांगतात,''तुमा सगळ्यास्नीच वेगळं पायजे तर व्हवून टाका...'' एका घरात तीन चुली होतात... पांडबाजवळचा पैसा संपतो. तो घड्याळ विकतो. तशात बायकोला दिवस जातात... कामाला तरी कोण कसं जाणार?... दोघंबी थंड चुली म्होरं किडं वळवळल्यासारखी वळवळतात. अशी 'संपा'ची रूपरेखा. ग्रामीण कुटुंबाच्या विघटनाची, शेतीतल्या कष्टावर अवलंबून असणाऱ्या जीवनातल्या नाजूक भावबंधांची.

खांडूक ही कथा जोगत्याची आहे.

**पुस्तकाची खास वैशिष्टये...**

**साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळवणाऱ्या लेखकाच्या ताज्या कथा.**

**ग्रामीण भागातील ताणतणावांचे वास्तव व परखड चित्रण करण्याचे कौशल्य.**

**आजच्या जीवनातील दांभिकपणा, खोटेपणा, मूल्याहिनता व दुभंगलेपण यांचे दर्शन घडवणाऱ्या व्यस्ततावादी शैलीतील कथा.**

म्हादबाला लहानपणी अंगभर खांडकं होतात. औषधांनीही फरक पडत नाही. तेव्हा आई त्याला देवळात घेऊन जाते. तिथं जटावाली बाई घुमत घुमत आळोखेपिळोखे देत ओरडत असते. म्हादबाला तिच्या पायावर डोके टेकवायला आई सांगते, आणि म्हणते, ''दोन वरसं झाली. ह्येच्या अंगाचं खाडूक हटायला तयार न्हाई...''

तेव्हा ती देववाली घुमणारी बाई सांगते, ''आईच्या मनात बालकानं जल्मभर सेवा करावी असं आहे... हे झाडं आईचं आहे. आईच्या पायाजवळच पाह्यजे. आंगभर भंडारा लावा... फुडच्या मंगळवारी गुण सांग.'' आणि म्हादबा बरा होतो. पण त्या नवसाचा विसर पडतो. पुढे तो मोठा होतो. आजी आजारी पडते. तिला उतार पडावा म्हणून नवसासाठी त्याला सौंदत्तीला डोंगरावर नेले जाते. आणि त्याला जागत्याची दीक्षा दिली जाते. लुगडं नेसून जोगवा मागताना त्याला वैताग येतो.

तो आईला म्हणतो,''आयला, सगळ्यांनी मिळून माझा गळा कापलासा.''

आई म्हणते, ''भाड्या, तुझ्या अंगाला लूत भरलीती तवा त्या बाईनं वाचवलं. बा मराय लागलाना तेला भंडाऱ्यानं तारलं. म्हणून तुला हे बोलणं सुचालंय...''

तेव्हा म्हादबाला वाटत की या म्हातारीचं नरड दाबावं. तो म्हणतो,''तवा सगळीच मेल्या असयासा तर काय तोटा व्हईत नव्हता.'' त्या रात्री त्या दोघां मायलेकरांच्या भांडणानं -सारी गल्ली जागी होते. एक बाई सहानुभूती दाखवत म्हणते, ''काय करल ह्ये?... लगीन न्हाई... काम न्हाई... बापडं काय करंल?'' आणि हे ऐकल्यावर म्हादबाच्या डोक्यात मुंग्यांची रांग उठते. म्हातारीला आईवरनं शिव्या देऊन तो बोंब मारत पळत सुटतो.

'उचकी'मध्ये घरातल्या दारिद्र्याला कंटाळून दादा एक प्रयोग करू पाहतो. ''दिवाळीच्या आमावस्येपूर्वी चार दिवस नवं गाडगं घेवून सिरसाच्या झाडाला बांधायचं. त्यात सात प्रकारच्या धान्याचा एकेक तुकडा टाकायचा. आणि आमावस्येला संध्याकाळी पूजा करून गाडगं घरी न्यायचं. त्यातले दाणे कणगीत टाकायचे. मग त्या कणगीतलं धान्य कधी संपत नाही... बघूया आता नशीब काय म्हणतंय.'' असे दादा आपल्या धाकट्या भावाला सांगतो... त्या प्रयोगातले दाणे कणगीत टाकले जातात. पण अमावस्येच्या रात्री घरात पोरं नाहीत हे बघून गावभर शोधाशोध चालू होते. शेवटी ते घरी येतात आणि त्यांची चांगलीच हजेरी निघते. तेव्हा धाकटा भाऊ आश्चर्याने आईला हा सर्व प्रकार सांगतो. कणगी नंतर मोकळी होते तेव्हा आई म्हणते, ''त्येला बी नशीब लागतंय लेका! आमचं नशीब कसलं- शेणानं लिवल्यालं.''



'बाई' या कथेतील तिढा वेगळाच आहे. नाग्या व शेक्या हे मित्र. बुलेटवाला शेक्या नाग्याला दोनचार पेग झाल्यावर नेहमी बायकांचे भन्नाट किस्से ऐकवतो. त्यामुळे नाग्याला वाटते की आपलं जगणं म्हणजे पुळचटच. तशात शेक्या त्याच्यापुढे एक प्रपोजल मांडतो. ''गोकाकात एक बाई आहे. तिला आपण समकात ठेवून घेऊ. जिंदगीभर आईश करायची.'' नाग्या त्या प्रस्तावामुळे चिडून शेक्यावर धावून जातो. शेक्या त्याला म्हणतो,''लेका, तुला झाली तीन पोरं. तुला एकट्याला बाई कोण भाळणार? त्यात तुझ्या सतरा वढाताणी... तुझं काय माझ्यासारखं आहे? ऐश करायची म्हणून मी अजून बायकोला पोर होऊ दिलेलं नाही. लग्नाला आठ वर्षे झालीत... आणि आणायच्या बाईशी काय आपल्याला लगीन करायचंय? जमतंय तेवढे दिवस ठेवून घ्यायची. कंटाळा आला की बायकोजवळ. तिचा कंटाळा आला की हिच्याजवळ. मागनं हाकलून द्यायची. दोघांनी खर्च केला तर पाचसहाशेत होईल. ऐश करायची तर ही रक्कम जास्त नाही. नाहीतर जिंदगाणीत हायच काय? नुसती वडाताण.'' तेव्हा मात्र नाग्यालाही विचार पटतो. दहाबाय बाराची खोली ते नक्की करतात, आणि कोण्या एका कमळीजवळ ते दोघे जातात. ''हे आमचं दोस्त.'' म्हणून शेक्या तिला नाग्याची ओळख करून देतो. ते कमळीला खोलीवर नेऊन ठेवतात. जेवणाचा डबा, दारूच्या बाटल्या... चार भांडी. चहासाठी स्टोव्ह. ते दोघे टायमिंग वाटून घेतात. सकाळ संध्याकाळ एकेकजण. रात्री आलटून पालटून... शेक्या व नाग्या यांची ही व्यवस्था काही दिवस व्यवस्थित चालते. नंतर नाग्याची बायको तक्रार करते,''तुमचे कायतरी बिनसलंय. आता बायको नकोशीच झालीया तुमाला. दुसरी कोण गावलीया का?'' नाग्याची दमछाक भयंकर. शेक्याही नाग्याला म्हणतो, ''गड्या, काय तरी इस्कोटरामायण झालंय. घरात गेलो की अंथरुणात सगळं अंगच लुळं पडतंय. बायको मला बुळाच समजायला लागलंय. काल तर तिनं सगळ्या घरातल्यासमोर उघडा केला. म्हणाली. ह्या बुळ्यापास्नं मला काय व्हयाची पोरं? असला खोटा माणूस माज्या पदरात का बांधल्यास?... माझी जीभच न्हाई उचलली. ह्या कमळीनंच कायतरी चेटूक केलंय... ह्या बाईला हाकलूनच लावूया माझं काम झालं की!''

शेक्याचं काम कुठलं असतं? तर कमळीला आपल्या बायकोसमोर उभं करून सांगायला लावायचं- ह्यो पुरुष हाय म्हणून. कमळी म्हणते, ''त्या परास जीव देजा म्हणावं की भाड्याला.''

...आणि कमळीच्या अंगावर सर्रकन काटा येतो... डोकं भिरंबाटतं. ती दोघं बाहेर गेल्यावर कमळी आपले कपडे वगैरे घेऊन चक्क पळ काढते.

ग्रामीण जीवनातले असे काही चमत्कृतिपूर्ण गुंते चितारण्यात राजन गवस यांचा हातखंडा आहे. त्यात वास्तव दर्शन आहे; सहानुभूती आहे. अगतिकता व करुणा आहे. ग्रामीण बोलीचा यथोचित वापर सराईतपणे ते करतात. नेमक्या प्रसंगातून कथानक पुढे नेतात.

या संग्रहातल्या रिवणावायली मुंगी, एक होता कावळा, तिच्या वळणाची गोष्ट, दादा कोतोलीकर, ढव्ह आणि लख्ख ऊन या कथा व्यस्ततावादी शैलीमधल्या आहेत.

त्यातही वास्तवाचेच दर्शन घडते पण ते वास्तव जीवनातील यांत्रिकता, बधिरता, विपरितपणा, हद्‌पारी व्यक्त करणारे असते.

प्रा.रा.ग.जाधव यांनी व्यस्ततावादाबद्दल म्हटले आहे,''व्यस्ततावाद हा वाङ्‌मयातूनही व्यक्तिजीवनातील व्यस्तता (ॲब्सर्डिटी) व्यक्त करीत असल्याने अनुभवांचे श्लील-अश्लील, नैतिक-अनैतिक, पुरोगामी-प्रतिगामी, आशावादी-निराशावादी, राष्ट्रीय-अराष्ट्रीय या किंवा या प्रकारचे वर्गीकरण समजू शकत नाही. व निर्माणही करता येत नाहीत, या भिन्न वादाशी समष्टिजीवन व संस्था विभिन्न संबंधांनी निगडित झालेली असतात. व्यस्ततावाद या दोहोंच्या बाबतीत कोणतेच

उत्तरदायित्व वा पूर्वदायित्व स्वीकारत नाही, आणि या दोहोंनी व्यस्ततावादी वाङ्मयाची बरीवाईट पर्वा केली तरी त्या वाङ्मयकाराला यांची पर्वा करण्याचे कारण नाही... एकाच संज्ञेचा चक्राकार उपयोग करून, जीवन किंवा कला यांतील द्वैत व्यस्ततावाद झुगारून देतो. व्यक्तिजीवनाच्या अस्तित्वाचेच एक रूप म्हणजे कला. व्यक्ती ही व्यवहारात विविध रूपांनी वावरते. बाप, भाऊ, बहीण, माता, नेता इ. तिच्या भिन्न रूपांचा आणि तिचा जो संबंध तोच कला व जीवन यांचा संबंध असे व्यस्ततावादी प्रतिपादन आहे. ही रूपे व्यक्तीसाठी आहेत हे म्हणणेही अनावश्यक व अर्थशून्य आहे. कला म्हणजे व्यक्तिजीवनाची व्यस्तता आविष्कृत करणारे व्यक्तिरूप.

त्याचबरोबर काहीशी एकांतिकता पत्करून आत्मनिष्ठेऐवजी व्यस्ततावाद आत्मद्रोहाचा पुरस्कार करतो. व्यक्तीला लाभणारे अनुभव हे तिच्या केवळ स्वातंत्र्याचे विरोधी असल्याने हा विरोध प्रकट करणे हाच खरा आत्मद्रोहाचा अर्थ आहे... सोन्याच्या पिंजऱ्यातील पोपटाला सोन्याचा चाराही बेचव, नि:सत्त्व व शत्रुवत वाटतो... त्याप्रमाणे व्यस्ततावादी मनोवृत्तीला सर्वच जीवनानुभव बेचव, नि:सत्त्व व विषासारखे वाटतात. जन्माचा अपघात, देहाची गुलामगिरी, घराचे दास्य आणि मरणाची अर्थशून्यता- यांच्या धाग्यांनी विणलेले व्यक्तिजीवनाचे अस्तित्व हेच वाङ्मयाचे व जीवनाचे खरे वास्तव असेल तर येणाऱ्या समग्र अनुभवांचा विद्रोह अनुभवून व व्यक्त करूनच व्यक्तीला यथार्थपणे जीवन जगता येईल.'' (साहित्य व सामाजिक संदर्भ. पृष्ठ १५१-१५५)


साहित्यातील वास्तववादी वृत्ती ही प्रामाणिकपणाची व कष्टाळूपणाची द्योतक आहे: परंतु वास्तववादी मनोवृत्ती जे आहे ते तसे रंगवते; जे आहे ते का असते, व जसे आहे तसेच का असते या प्रश्नाची दखल वास्तववादी वृत्ती घेत नाही. त्यामुळे वास्तववादी साहित्य हरिभाऊ आपटे यांच्याप्रमाणे पारंपरिक मूल्यांनी प्रभावित होते. किंवा वरेरकरांच्या चित्रणाप्रमाणे अद्‌भूत ठरते. व्यस्ततावादाला व्यक्तिबाह्य निष्ठा मान्य नाहीत. यमूचे दु:ख शंकरमामंजींच्या अस्तित्वाशिवायही अस्तित्वात होते हे हरिभाऊंना समजले नाही, कारण व्यक्तिजीवनातील मूलभूत व्यस्तताच त्यांना समजली नाही... वास्तववादात साहस आहे पण मौलिक सत्यता नाही, कष्टाळूपणा आहे पण त्याला मोल येत नाही. मनोविश्लेषणाचा आधार आहे पण मनाचा नाही. त्यात सायकॉलॉजी आहे पण सायकी नाही. म्हणून वास्तववाद ही मनोवृत्तीच होऊ शकत नाही, उलट व्यस्ततावाद ही एक स्वयंपूर्ण व सर्व समावेशक वृत्ती आहे. (पृष्ठ १५६-१५७)

'रिवणावायली मुंगी'या कथेची नायिका प्रारंभीच म्हणते, ''तेव्हा मी ठरवून टाकलं होतं, आता आपण घरचे म्हणतील तसं वागायचं. तुम्ही म्हणाल, एवढ्या बंडखोर पोरीनं असा काही निर्णय घेणं म्हणजे पराभव पत्करणं. तुम्ही काहीही म्हणू शकता. तुमच्या म्हणण्याला माझ्या लेखी काही एक किंमत नाही. म्हणजे तुम्हाला मी झीरो समजते. पर्याय नाही. माझा मला विचार करायचा असेल तर तुम्हाला किंमत देण्यात अर्थ नाही. हे माझे पूर्ण अनुभवान्ती झालेले त्यावेळचे नव्हे आताचेही मत...''

या अशा सुरुवातीच्या वाक्यांनीच व्यस्ततावादी शैलीचा व मनोवृत्तीचा बोध वाचकांना होऊ शकेल. या कथांचे आकलन-आस्वादन हे वाचकांच्या प्रकृतीवर व मनोवृत्तीवर अवलंबून राहते... या संग्रहातील अशा कथांचा परामर्श हा ज्याचा त्याने घेणेच इष्ट ठरेल. श्याम मनोहर, विलास सारंग, दिलीप पुरुषोत्तम चित्रे वगैरे लेखकही व्यस्ततावादी लेखनासाठी विख्यात आहेत. 'रिवणावायली मुंगी'मधील वास्तव ग्रामीण कथा आणि या व्यस्ततावादी कथा यांच्यातील जुगलबंदी वेगळाच आनंद देऊ शकेल. राजन गवस यांच्या लेखन कौशल्याचीही ती करामत तोंडात बोटे घालायला लावील.

**पृष्ठे : १७० किंमत : १७०रु. सभासदांना :१२८रु. पोस्टेज :२०रु.**






# ३००१ द फायनल ओडिसी

**मूळ लेखक : आर्थर सी क्लार्क**
**अनुवाद : डॉ.प्रमोद जोगळेकर**

**गुरू ग्रहाच्या उपग्रहांचा शोध घेण्याची अंतरिक्ष मोहिम**

लंडनच्या किंग्ज कॉलेजमधून पदवी घेतलेल्या व ब्रिटिश इंटरप्लॅनेटरी सोसायटीचे अध्यक्षपद भूषविलेल्या आर्थर सी. क्लार्क यांना १९४५मध्ये रॉयल एअर फोर्समध्ये रडार ऑफिसर म्हणून काम करताना दळणवळण उपग्रहाची कल्पना सुचली. पुढे ती कल्पना प्रत्यक्षात उतरली आणि उपग्रहांवरून माहितीचे संप्रेषण ही बाब जगभरच्या प्रसार माध्यमांमध्ये क्रांती घडवून आणणारी ठरली. १९६८ मध्ये '२००१:ए स्पेस ओडिसी' हा क्लार्कच्या कथेवरील चित्रपट प्रदर्शित झाला आणि विज्ञानकथांना एक नवी कलाटणी मिळाली. स्टार वॉर्स आणि क्लोझ एनकाउंटर्स ह्या चित्रपटांनी पुढच्या दशकात लोकप्रियतेची एक वेगळीच उंची गाठली. क्लार्कला '२०१०: ओडिसी टू' ही नवी विज्ञानकथा लिहिणे भाग पडले. तिच्यावरचा चित्रपटही बॉक्स ऑफिसवर हिट ठरला. गुरूग्रहाकडे डिस्कव्हरी हे यान प्रयाण करते, त्या यानाचा मेंदू म्हणजे महासंगणक एच.ए.एल. हअल (Heuristically Programmed Alogorithmic) हा **हअल** संगणक माणसासारखा बोलू शकतो. तो अचानक बंड करून यानावरच्या लोकांना इजा करण्याचा प्रयत्न करतो. डिस्कव्हरी यानाचा प्रमुख कॅप्टन डेव्ह बौमन हा त्या हअल संगणकाला निष्प्रभ करण्यात यशस्वी होतो अशी '२००१: द स्पेस ओडिसी'ची रूपरेखा आहे.

ओडिसीचा दुसरा टप्पा '२०१०: ओडिसी टू'मध्ये येतो. लिओनोव्ह हे एक रशियन अंतरिक्षयान गुरू ग्रहाभोवती प्रदक्षिणा घालणाऱ्या डिस्कव्हरी यानाशी संपर्क साधते. डिस्कव्हरीचा मार्गदर्शक महासंगणक हअल निकामी झालेला असल्याने डिस्कव्हरी यानाला अन्य काहीच पर्याय नसतो. गुरूग्रह व त्याचे चंद्र, पृथ्वीवर पाश्चात्य व पौर्वात्य देशांमध्ये वाढत चाललेला संघर्ष, याबद्दलही या कादंबरीत बरेच तपशील येतात. रशियन अंतरिक्षयान लिओनोव्ह याला पृथ्वीवर परतण्यात काही अडचणी येतात. डिस्कव्हरीवरील बंडखोर महासंगणक कॉपी करणारा डेव्ह बौमन हा हअलला पुन्हा कार्यान्वित करतो आणि गुरू ग्रहाला दूसरा सूर्य बनवून अंतरिक्षयानाला पुन्हा अपेक्षित कामाच्या दृष्टीने कार्यप्रवण करतो. माणूस आपल्या दुराग्रही वृत्तीमुळे तसेच अंगभूत अवगुणांच्या आहारी जाऊन संपूर्ण मानवजातीचे भवितव्य धोक्यात आणत आहे, असा इशारा या कादंबरीद्वारे क्लार्क देतो.

## साठोत्तरी दशकातील विज्ञानाची झेप

१९६० मध्ये लेसर किरणांचा व्यावहारिक वापर करण्याबाबत संशोधन सुरू झाले.

१९६१ मध्ये मानवाने अंतरिक्षयानातून अवकाशात भ्रमण करण्यात यश मिळविले.

१९६२ मध्ये दळणवळण उपग्रह यशस्वीपणे सोडण्यात आला.

१९६३ मध्ये सुपरसोनिक स्वनातीत विमानांचे उड्डाण

१९६४ मध्ये क्वासार्सचा शोध लागला.

१९६६ मध्ये मानवरहित यान चंद्रावर उतरले.

१९६७ मध्ये पहिली हृदयारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी झाली.

१९६८ मध्ये पल्सर्सचा शोध लागला.

१९६९ मध्ये चंद्रावर मानवाने पाऊल ठेवले.

'२०६१: ओडिसी तीन'ही या मालिकेतील तिसरी कादंबरी; आणि '३००१ : द फायनल ओडिसी'ही चौथी.

१९६८मध्ये पहिली ओडिसी कादंबरी आली तेव्हा ज्या गोष्टी केवळ कल्पनेने रंगवलेल्या होत्या त्या एका दशकातच प्रत्यक्षात येताना दिसल्या. १९६८मध्ये प्रत्यक्षात गुरू ग्रहावरून संशोधनाला प्रारंभ झाला आणि व्हॉएजर या मानवरहित अवकाश यानाने तेथील अनेक छायाचित्रे व उपग्रहांची माहिती पाठविली. गुरूच्या गुरुत्वाकर्षणाचा या अवकाशयानांमध्ये वापर करण्यात आला होता, तो आर्थर क्लार्कने आपल्या कादंबरीत आधीच दाखवलेला होता.

व्हॉएजर यानाने गुरूची जी चित्रे पाठवली त्यावरून तेथे गंधकांचे फवारे उडणारे ज्वालामुखी, खाचखळग्यांनी भरलेला खडबडीत कॉलिस्टो उपग्रह, विचित्र पृष्ठभाग असलेला गनीमीड उपग्रह-यामुळे एक नवीन सूर्यमाला जणू उजेडात आल्याची भावना होत होती. त्यानंतर '२०१०:ओडिसी दोन' ही कादंबरी लिहिताना ओडिसी एकचा एक अंतरिक्षवीर डेव्ह बौमन याला आर्थर सी क्लार्कने पुन्हा जिवंत केले.

तिसरी ओडिसी कादंबरी लिहिताना, गुरूवर जाणाऱ्या चॅलेंजर यानाला अपघात झाल्याने नवी छायाचित्रे मिळण्याचा मार्ग खुंटला. दहा वर्षे तरी गुरूच्या उपग्रहाबद्दल नवी माहिती मिळणे दुरापास्त ठरले. परंतु आर्थर सी क्लार्कला हॅलेच्या धूमकेतूच्या दर्शनाने पुन्हा उभारी आली आणि तिसरी कादंबरी त्याने लिहून पूर्ण केली. या तीस वर्षांच्या लेखन कालात तंत्रज्ञानात विलक्षण प्रगती झाली. या चारी कादंबऱ्यात प्रसंग व पात्रे यात समानता आणि सुसंगती आहे. त्यांची मध्यवर्ती कल्पना सारखीच आहे.

चौथी कादंबरी लिहिताना आयबीएम कंपनीने क्लार्कला थिंकपॅड ७५५ सीडी कॉम्प्युटर भेट म्हणून दिला; मानवजातीला भविष्य आहे की नाही हे आपले वंशजच ठरवणार आहेत, मूर्ख व आनंदी असावे की शहाणे व दुःखी असावे, यापैकी कोणत्या पर्यायाला माणसाने अग्रक्रम द्यावा



असा प्रश्नही आर्थर सी क्लार्क विचारतो आणि 'शहाणे आणि आनंदी' असा तिसरा पर्याय पसंत करतो.

क्लार्क हा आशावादी लेखक आहे. श्रीलंकेत गेली वीस वर्षे त्याचे वास्तव्य आहे. उच्च तंत्रज्ञानाचा लाभ तिसऱ्या जगातील विकासशील देशांना मिळावा म्हणून त्या तंत्रज्ञानाचे हस्तांतरण सुलभरीत्या व्हावे यासाठी त्याने आर्थिक व धोरणात्मक मदत सातत्याने केलेली आहे. कोलंबो जवळच्या मोराटुवा युनिव्हर्सिटीत दि आर्थर क्लार्क सेंटर फॉर मॉडर्न टेक्नॉलॉजीज् , स्थापन करून त्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. पर्यायी ऊर्जा स्रोत्रे, रोबोटिक्स, फायबर ऑप्टिक्स, अंतरिक्ष याने, क्षेपणास्त्रे वगैरे बाबतीतही तेथे संशोधन चालते. तिसऱ्या जगातील शेतीच्या प्रगतीला पोषक ठरेल अशा संशोधनावरही तेथे भर देण्यात येतो. प्रगत तंत्रज्ञानाने मानवजातीचे कल्याणच होणार आहे असा क्लार्कचा ठाम विश्वास आहे.

'३००१: द फायनल ओडिसी' ही क्लार्कची ओडिसी मालिकेतील चौथी व अंतिम कादंबरी.

डिस्कव्हरी मोहिमेत दीर्घनिद्रेमध्ये ठेवण्यात आलेल्या तीन प्रमुख अंतराळवीरांच्या शरीरक्रियांवर लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणा हअलने तोडून टाकल्या. त्यामुळे डेव्ह बौमनने त्या तिघांना यानातून बाहेर काढले. डेव्ह बौमन व फ्रँक पूल हे डिस्कव्हरीवरचे डेप्युटी कमांडर होते; पण त्यांनाच त्या अंतरिक्षयानाचे नियंत्रण करण्याची जबाबदारी स्वीकारावी लागली. बौमनने अत्यंत कौशल्याने डिस्कव्हरी यानावर ताबा मिळवला. परंतु यानाची गुरूभोवती फिरण्याची कक्षा बदलली गेली आणि त्यामुळे ते तिघे अंतराळवीर गुरूकडे ओढले गेले व भस्मसात झाले. बौमनने हअल संगणकाची सर्व स्मृती अक्षरशः उपसून काढली आणि टायको पाषाणाचा मोठा भाऊ शोभावा अशा बिग ब्रदरला तो भेटला. त्या पाषाणाकडे ते यान ओढले गेले. लिओनोव्ह मोहिमेतील यान बौमननं सोडून दिलेल्या डिस्कव्हरी यानापर्यंत जाऊन पोहोचले. त्यात डॉ.चंद्रा होते. हअल महासंगणकाला सुरुवातीपासून ट्रेनिंग डॉ.चंद्रांनी दिलं होतं. डिस्कव्हरीत प्रवेश करून डॉ.चंद्रा यांनी हअलला पुन्हा कार्यान्वित केले. पण नंतर काही चमत्कारिक घटना घडू लागल्या. लिओनोव्हने चंद्राभोवती प्रदक्षिणा घालायला सुरुवात केल्यावर लिओनाव्हचा मुख्य शिल्पकार डॉ.हेवूड फ्लॉइड याला हअल एक संदेश देते; आणि तो संदेश असतो, ''**इथं राहणं धोक्याचं आहे... तुम्ही पंधरा दिवसांच्या आत येथून बाहेर पडा.**'' हा संदेश बौमनकडूनही येतो... आणि खरोखर, ते सर्वजण लिओनोव्हमधून बाहेर पडल्यावर गुरू ग्रहाचा स्फोट होतो.

त्या स्फोटानंतर छत्तीस वर्षांनी गॅलक्सी अंतराळयान हायजॅक करून युरोपा या गुरूच्या उपग्रहावर उतरवण्याचा प्रयत्न केला गेला; तेव्हा त्या यानाच्या मदतीसाठी युनिव्हर्स हे यान पाठवण्यात आले. या युरोपा उपग्रहाची माहितीही 'दि फायनल ओडिसी'मध्ये जुन्या चित्रफितींच्या माध्यमातून येऊन जाते. एवढेच नव्हेतर मधल्या हजार वर्षात घडलेल्या घटनांचीही काहीशी विस्कळित जंत्री येऊन जाते. तिच्यातील महत्त्वाचा भाग हा फ्रँक पूल याच्याशी संबंधित आहे. हा फ्रँक पूल खरे तर (इ.स.२०००मध्ये सोडलेल्या) मूळ डिस्कव्हरी यानाचा डेप्युटी कमांडर अंतराळवीर. गॉलियथ या अंतराळयानाचा कॅप्टन शॅन्डलर याला अंतराळावर नजर ठेवणाऱ्या रडारवर एक दोनतीन मीटर लांबीच्या वस्तूच्या अस्तित्वाची नोंद झालेली दिसते, त्या वस्तूला हस्तगत करण्यासाठी तो आपल्या यानातील अंतरिक्षवीरांना पाठवतो, ती वस्तू हाती लागते तेव्हा त्याच्या लक्षात येते की हा एक हजार वर्षे वय असलेला अंतराळवीर फ्रँक पूल आहे. यूएसएसएस

डिस्कव्हरी या मोहिमेचा हा एक दुय्यम संचालक गुरू ग्रहावरच्या गुप्त मोहिमेवर असताना, यानाबाहेर फेकला जातो. पृथ्वीपासून दोनेक हजार किलोमीटरवर बेशुद्ध होतो, त्याच्या शरीरातील नेहमीच्या जैविक क्रिया बंद पडतात, आणि एक हजार वर्षांचा काळ तो अंतराळात दीर्घ निद्राकोषात तो राहातो. गॉलियथ यानावर त्याला मधल्या हजार वर्षात काय घडले असावे याबद्दलची माहिती अर्काइव्हच्या संग्रहालयाच्या ध्वनिफितींवरून थोडीफार कळते. फ्रँक पूलमुळे मधल्या काळातील काही मिळू शकेल अशीही अपेक्षा असते. फ्रँक पूलमधले जैविक घड्याळ पूर्णपणे बंद पडलेले नसल्याने, हजार वर्षे उलटूनही त्याचे वय पन्नास ते सत्तर वर्षांनीच वाढलेले आहे, आणि गुरूपासून लक्षावधी किलोमीटर अंतरावर येऊनही त्याला प्रत्यक्ष पृथ्वीवर जाता येत नाही. कॉम्प्युटरने निर्माण केलेल्या कृत्रिम पृथ्वीवरच जावे लागते हेही त्याला सांगण्यात येते.

फ्रँकच्या दिमतीला डॉ. इंदरा वॅलेस ही 'गैशा' देण्यात येते. तिचा इ.स.२००० ते २०५०हा खास संशोधनाचा विषय असतो. ती फ्रँकला इ.स.३०००मधील भाषा, समाज, जग, अंतरिक्ष, चालीरीती यांची कल्पना देते. त्याची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी, त्याचे मानसिक व शारीरिक संतुलन राहावे यासाठी विविध मार्गांचा अवलंब करते. एकविसाव्या शतकातून एकदम एकतिसाव्या शतकात आलेल्या फ्रँकला मधल्या काळातले बदल चक्रावून सोडतात. आपल्या खाण्यापिण्याचा, उपचाराचा, प्रवासाचा खर्च कोण करणार असे तो विचारतो; तेव्हा इंदरा त्याला सांगते, ''**तू म्हणजे म्युझिअमधला एक नमुना आहेस... तुझ्याकडून मिळेल ती माहिती आम्हाला उपयुक्त ठरणार आहे.** तुला शक्य ते सर्व पुरवण्याचाही आदेश आहे. तुला लागणारे नवे कपडे देण्यात येतील. येथील कामे करण्याचे तंत्र याबद्दल माहिती देण्यासाठी व तुझ्या वैयक्तिक मदतीसाठी दनिल हा सहायक तुझ्या दिमतीला देण्यात येईल.''

हा दनिल कुठलंही काम करण्यासाठी चौकोनी प्लॅस्टिक कार्ड वापरतो. दनिलबरोबर फ्रँकची चंद्रलोकाची सहल होते. बारा हजार किलोमीटर उंचीवर जाण्यासाठी दोन मार्ग असतात. टॉवरबाहेरच्या लिफ्टने किंवा टॉवरच्या आतून जाणाऱ्या लिफ्टने तेथे जाता येते. टॉवरबाहेरच्या लिफ्टने जाताना बाहेरच्या विश्वातील दृश्ये पाहता येतात. वर जाण्याचा वेग प्रचंड असतो तेव्हा फ्रँकच्या मनात येऊन जाते, **''अतिप्रगत तंत्रज्ञान आणि जादू यामध्ये फारसा फरक उरत नाही.''** पूर्वीप्रमाणे रॉकेटची आता गरज नव्हती. त्यामुळे वेग जाणवत नव्हता. अर्ध्यातासातच ते सर्वजण चंद्राच्या गुरुत्वाकर्षणात शिरतात. ते पृथ्वीच्या एकषष्ठांश असते. टॉवरवरच्या टोकाला लागून पन्नास मीटर उंचीवर एक प्लॅटफॉर्म होता. गुरुत्वाकर्षण कमी असल्याने चालायला त्रास होत नाही. तेथील पार्कमध्ये शेकडो रोबो दिसतात. माळी म्हणून काम करताना दिसतो तो ज्युरॅसिक पार्कमधला रॅप्टर. डायनोसॉर, हे **डायनोसॉर तेथील सर्व प्रकारची कामे पाळीव प्राण्याप्रमाणे करतात.** मुलांना सांभाळतात. सर्वत्र स्वच्छता ठेवतात. चिंपाझी किंवा गोरिला या प्राण्यांमध्ये चिकाटी कमी असते. उलट डायनोसॉरना हजार वर्षात जैवतंत्रज्ञानाचा वापर करून मवाळपणे वागण्यास प्रवृत्त केले गेले आहे. अशी माहिती इंदरा ही फ्रँकला देते.

फ्रँकला तेथे हवेत पक्ष्याप्रमाणे उडण्याचे प्राथमिक धडे देण्यात येतात. त्यासाठी त्याला विशिष्ट प्रकारचे पंख जोडण्यात येतात. पंखांमध्ये पिसांच्या जागी तलम पटल असते. हवेतून उड्डाण करणे जमल्यावर आपण १९ वर्षांचे तरुण आहोत असे फ्रँकला वाटते. पन्नास मीटर उंचीवरूनही तो खाली झेपावतो. तेथे गुरुत्वाकर्षण पृथ्वीच्या एकदशांश असल्याने खाली पडण्याचा धोकाच



नसतो. मग इजा होण्याचे नावच नको. उडतानाच भव्य अवकाशगंगा त्याला दिसते. एका सेकंदात लक्षावधी तारे इकडेतिकडे जाताना दिसतात. हे सारे उडण्याच्या घुमटात कसे साठवून ठेवले आहे हे कोडे त्याला पडते.

त्याच्याकडे एक वस्तू उडत येताना त्याला दिसते. ती वस्तू म्हणजे असते एक ड्रॅगन. आणि त्या ड्रॅगनच्या पाठीवर असते एक सुंदर परी. त्या परीला पाहताच फ्रँक तिच्या एकदम प्रेमातच पडतो. तेव्हा इंदरा त्याला म्हणते,''ती आहे ड्रॅगन लेडी. तिचं नाव आहे ऑरोरा मेकॉले. सोसायटी फॉर क्रिएटिव्ह ॲनाक्रोनिझम ही संस्था ती चालवते. ड्रॅगनसारखे चित्रविचित्र प्राणी बनवते. निरनिराळ्या काळामधील प्राण्यांचा सरमिसळ संकर करण्यात तिचा हातखंडा आहे.'' ड्रॅगनवर ऑरोराच्या पाठीमागे स्वार होऊन फ्रँक फेरफटका मारतो. ड्रॅगन ताशी शंभर किलोमीटरपेक्षाही जास्त वेगाने उडतो... तो तिला आपल्या घरी घेऊन जातो... पण ती त्याला नंतर पलंगावरून ढकलून देऊन म्हणते,''माफ कर, आपला वेळ आनंदात जाईल असं मला वाटलं होतं. पण तू विद्रूप झालेला आहेस हे मला माहित नव्हतं.''

आपण विद्रूप झालेलो आहोत असे ड्रॅगन लेडी का म्हणते, हे फ्रँक प्रा.अँडरसन यांना विचारतो. विद्रूप होणे याचा अर्थ सुंता केलेली असणे. प्रा.अँडरसन त्याला म्हणतो, 'पाहिजे तर अवयवारोपण करू शकू.' पण फ्रँक त्याबद्दल उत्सुकता दाखवत नाही.

इंदरा फ्रँकशी इ.स.२००० ते ३००० मधल्या घटनांबद्दल चर्चा करत राहते... परक्या काळातला परका माणूस म्हणून स्टारसिटीत वावरणाऱ्या फ्रँकला आपण कशासाठी जगतोय हेच कधी कधी कळेनासे होते.(७९)

पृथ्वीपासून दोन हजार किलोमीटर उंचीवर असणाऱ्या स्टारसिटीवरील अंतराळ स्थानकावरून गुरूग्रहाचा उपग्रह असलेल्या गनीमीड चंद्राकडे गॉलियथ यानातून फ्रँक पूलही कॅप्टन शँडलरबरोबर जातो. गुरूला आयो, युरोपा, गनीमीड आणि कॅलिस्टो हे चार उपग्रह असतात, आणि

त्यातील आयो हा सर्वात आतला चंद्र कुरू ल्युसिफर ग्रहाच्या अगदी जवळ असल्याने, त्याच्यावर गुरुत्वाकर्षणामुळे सतत हालचाल होत असते. त्या हालचालीतून उष्णता निर्माण होते आणि त्यामुळे आयोचा पृष्ठभाग हा अर्धवट वितळलेल्या अवस्थेत असतो. ज्वालामुखीसारखा लाव्हा सर्वत्र पसरत असल्याने दर दहा वर्षांनी या पृष्ठभागाचे नकाशे बदलावे लागतात. आयोच्या बाहेरच्या कक्षेमध्ये युरोपा हा चंद्र आहे. त्यावर आरंभी बर्फाचे आवरण होते. गुरू ग्रहाचे ल्युसिफरमध्ये रूपांतर झाल्यावर मात्र हे बर्फाचे आवरण वितळत गेले आणि ज्वालामुखीमुळे छोटी छोटी बेटे निर्माण झाली. गनीमीड हा तिसरा उपग्रह सूर्यमालेतील सर्वात मोठा चंद्र. (व्यास ५२६०किलोमीटर.) या चंद्रावरचे वातावरण श्वासोच्छ्वासासाठी तेवढेसे योग्य नाही. तेथे 'अनुबिस सिटी'या वस्तीत ४१ हजार लोक राहतात. या चंद्रावरचे लोक जमिनीची निर्मिती आणि वैज्ञानिक संशोधन करण्यात गुंतलेले आहेत. कॅलिस्टो या चौथ्या उपग्रहाचा पृष्ठभाग उल्कापातामुळे खडबडीत बनलेला आहे.

गनीमीडवरील रस्ते पाच ते वीस किलोमीटर रुंदीचे आहेत. बर्फाच्या आकुंचन प्रसरणामुळे त्यांची रुंदी बदलते. गनीमीडवर पाण्याचे प्रचंड साठे आहेत. येथील पाणी शुक्रावर नेता येईल का असा विचार कॅप्टन शँडलरच्या मनात येतो. तेथील ग्रँड गनीमीड हॉटेलमध्ये फ्रँक पूल व त्याचे सर्व सहप्रवासी उतरतात. अनुबिस शहराला (दोन किलोमीटर व्यासाच्या) तीन मोठ्या घुमटात लोक

राहात. गनीमीडच्या आकाशात नव्यानेच बनलेला गुरू ल्युसिफर हा ग्रह कायम एकाच ठिकाणी चमकत राही. त्याची एक बाजू कायमस्वरूपी ल्युसिफरच्या प्रकाशात राही. दुसऱ्या भागावर त्यावेळी रात्र असायला हवी, पण तशी ती नसे. कारण मूळच्या ग्रहमालेतला सूर्य त्या भागाला अर्धा दिवस प्रकाश देत असे.

फ्रँक पूलला मात्र युरोपा उपग्रहाबाबत जास्त कुतूहल असते. युरोपावर पाणी होते. त्यात सजीव जीव राहात होते. हे सजीव प्राणी गेल्या हजार वर्षाच्या काळात उत्क्रांत पावलेले होते; चाळीस लाख वर्षांपूर्वी पृथ्वीवर असेच वातावरण होते याची फ्रँक पूलला कल्पना होती. त्यामुळे त्याला या उपग्रहाच्या अभ्यासात विशेष रस होता. मिस प्रिंगल ही इंदराला पत्र पाठवून या शहराबद्दलची माहिती कळवते. या शहरातील तरुण पृथ्वीवर आक्रमण करण्याची प्रचंड योजना आखण्यात गुंतलेले आहेत असे मिस प्रिंगल इंदराला कळवते. या तरुणांना डॉ.थिओडोर खान-टेड- याचे मार्गदर्शन मिळत असते. तत्त्वज्ञान व धर्म यात टेडला विशेष रस वाटतो. युरोपा ग्रहावरील सजीव सृष्टीचा पत्ता लावण्यासाठी तो फ्रँक पूलला एक शटल देण्याची तयारी दाखवतो. युरोपावर डेव्ह बौमन असावा असाही त्याचा कयास असतो. गॅलियथवरचं फाल्कन हे छोटेखानी शटल घेऊन फ्रँक मिस प्रिंगलबरोबर युरोपाउपग्रहावर जातो. चार लाख किलोमीटरचे अंतर त्यासाठी कापावे लागते. फ्रँक पूल युरोपाच्या जवळ पाचशे किलोमीटर पोचल्यावर 'गनीमीड'ला निरोप पाठवतो, 'माझ्या शटलवर कोणातरी परक्या शक्तीनं ताबा मिळवला आहे. मी युरोपाकडे खेचला जातोय. तेथे सुरळीत उतरेन अशी खात्री आहे.' आणि तो दुसरा संदेश डेव्ह बौमन नावे पाठवतो,''डेव्ह मी तुझा जुना मित्र फ्रँक आहे. माझ्या शटलवर ताबा मिळवणारी शक्ती तूच आहेस का? तू युरोपावर आहेस असे मला वाटतेय. तुला भेटण्याची मला इच्छा आहे.'' तो युरोपापासून पन्नास किलोमीटर उंचीवर येतो, तरीही त्याला कोणी अडवत नाही. तो युरोपाच्या गॅलिली समुद्राजवळून ताशी शंभर किलोमीटर वेगाने उडत राहतो. तेथील टायको पाषाणाला सर्वजण ग्रेट वॉल म्हणत असत. हा आडवा पाषाण वीस किलोमीटर लांब आणि दहा किलोमीटर उंच होता. समुद्रातून येणाऱ्या मोठ्या लाटा ही पाषाणवजा भिंत अडवत होती. फ्रँक पूल युरोपावर आपले यान उतरवतो. गनीमीडवरील कॅमेरा त्याचे फोटो घेतो... फ्रँक तेथील सजीवांचा शोध घेतो. वडासारखा प्रचंड प्राणी त्याला दिसतो. आपले अवयव इकडेतिकडे पसरून फ्रँकभोवती एक रेखीव वर्तुळ तो प्राणी तयार करतो. त्यामुळं आपल्या भोवती एक प्रचंड पारदर्शक भिंतच उभी आहे असे त्याला वाटते. काही जीव गुलाबाच्या झुडपासारखे दिसतात. काही त्यापेक्षा मोठे काटेरी.

फ्रँक पूल आपल्या यानाच्या स्पीकरवरून संदेश देतो,''हॅलो, हॅलो, मी फ्रँक पूल. माझा आवाज ऐकू येतोय का? मी इथे सर्व मानवजातीकडून शांततेचा संदेश घेऊन आलोय.''

-आणि त्याला प्रतिसाद मिळतो. कोणीतरी त्याला सांगते,

''होय. फ्रँक. मला तुझं बोलणं ऐकू येतंय.''

तो आवाज डेव्ह बौमनचाच असतो. हजार वर्षांनी त्या दोन मित्रांची भेट होते. डेव्ह त्याला मधल्या हजार वर्षांतल्या घटना सांगतो. गुरूवरच्या टायको पाषाणानं त्याला शोषून घेऊन एखाद्या पकडलेल्या प्राण्यासारखं नमुना म्हणून वापरलं. पृथ्वीची माहिती घेऊन, हअलच्या स्मृतिकोशातून बरेच तपशील मिळवले. तो टायको पाषाण म्हणजे एक यंत्र असते. स्वयंचलित. त्याला स्वत:च्या भावभावना नसतात. डेव्ह त्या पाषाणाच्या आज्ञेने तेथे नर्सरी उघडून सजीव जीवसृष्टी निर्माण



करण्यात स्वत:ला झोकून देतो... हअल आणि डेव्ह म्हणजे त्या टायको पाषाणाच्या स्मृतिकोशात केलेल्या नक्कलवजा निर्मिती आहेत, असेही फ्रँकला वाटते. नंतर तो आपल्या यानावर परततो. व्हील चेअरसारख्या एका यानातून तो पृथ्वीलाही एका तासासाठी भेट देतो.

डेव्ह त्याला संदेश पाठवतो,''हॅलो, फ्रँक. मी डेव्ह बोलतोय. एक महत्त्वाचा संदेश, तू आता आफ्रिका टॉवरमध्ये आहेस हे मला ठाऊक आहे. तुझी ब्रेनकॅप चालू कर. मी पाठवलेला संदेश तीन मिनिटांचा आहे. मध्येच थांबून तो पाहण्याचा प्रयत्न करू नकोस. अर्धा तास झाल्यावर तो संदेश पोचेल...''

फ्रँक त्या संदेशाची माहिती आपल्या सहकाऱ्यांना युरोपा कमिटीला देतो.

''डेव्ह बौमन आणि हअल या दोघांना टायको पाषाणनं प्रतिमारूपानं साठवून ठेवले आहे. तो अधूनमधून त्यांना कार्यान्वित करून आपल्यावर लक्ष ठेवत असतो... मी युरोपावरून परत आल्यावर त्याची हेरगिरी जास्त वाढलेली आहे... ह टायको पाषाण कुठल्यातरी अतिविशाल वैश्विक जाळ्याचे भाग आहेत. त्यांचे मुख्य केंद्र अज्ञात आहे. पण उपकेंद्र ४५० प्रकाशवर्षे अंतरावर आहे...''

डेव्हने पाठवलेल्या संदेशाचे वाचन झाल्यावर सभेच्या अध्यक्षा ओकॉनर म्हणतात, ''हअल मानवाला त्या पाषाणाच्या स्मृतिकोशाचा उपयोग करून घेता येत असणार. त्याला मानवजात टिकते की नाही याबद्दल कुतूहल आहे. गरज पडली तर मदत करायला तो तयार आहे.''

''टायको पाषाणासारख्या जबरदस्त शक्तीशी आपण मुकाबला कसा करणार?...''

याबाबत बिग ब्रदर पाषाण (स्वविरहित यंत्र) त्यांना मार्गदर्शन करतो. ''रासायनिक आणि जैविक मारेकऱ्यांबरोबरच या इलेक्ट्रोनिक विषाणूंना व्हॉल्टमध्ये ठेवण्यात आलेले आहे असेही कळते.''

...हअल मानवाचा संदेश येतो, ''सुरुवात झालेली आहे. पाषाणाला संसर्ग झालेला आहे. विषाणू आमच्यामध्येही शिरले असावेत. आम्ही अपयशी ठरलो तरी आम्हाला विसरू नका.''

काही वेळाने चंद्र, पृथ्वी, मंगळ येथूनही बातम्या येतात.

**मानवजातीविरुद्ध चाललेले विध्वंसक विषाणू हल्ले थांबतात. झुडपासारख्या दिसणाऱ्या सजीवांच्या भावना समजणे अवघड असते.**

स्पीकरवरून घोषणा होते, ''काम पूर्ण झालेले आहे. आपण सर्वजण आता पुन्हा प्लेटो सिटीकडे परतणार आहोत.''

फ्रँक पूल पृथ्वीकडे नजर टाकतो. दूरवर तारकापुंजामध्ये देवासारख्या शक्ती असतात, त्या त्यांच्या जागी राहणार असतात.

**माणसाच्या दृष्टीने दोनच गोष्टी महत्त्वाच्या असतात असे त्याला वाटते. त्या दोन गोष्टी म्हणजे प्रेम आणि मरण.**

**धर्मविषयक चिंतन**

धर्मविषयक काही चिंतनही या कादंबरीत येते. ते डॉ. टेड खान यांच्या माध्यमातून. 'थिओडोर'चे टेड हे संक्षिप्त संबोधनाचे रूप. तो धर्मविरोधी असल्याचे दाखवले आहे. टेडच्या घरी पोपचे चित्र असते. पाखंडी गणल्या गेलेल्या पोप पायस विसावा याचे चित्र. तो त्याचा हिरो असतो. महान व उत्तम कलाकृतीच्या निर्मितीसाठी मिळालेली स्फूर्ती धर्मातून येते हे त्याला मान्य नसते.

हअल हा महासंगणक तयार करणारा डॉ. चंद्र यांच्याबद्दल त्याला आदर वाटतो. पण डॉ.चंद्रा जर लहानपणी दुसऱ्या धर्मीय घरात वाढला असता तर हिंदू होण्याऐवजी अन्य धर्मीय असता, त्याच्या कौशल्याचा व धर्माचा काही संबंध नाही असे टेड सांगू पाहतो. तो धर्माला दुष्टपणा मानतो. धर्मयुद्धांनी अनेक माणसांचा बळी घेतला. शेकडो वर्षे वेडपट लोक देवाचे संदेश आपल्याला मिळत आहेत असे सांगून लोकांना फसवतात. या स्वयंघोषित प्रेषितांनी दीर्घकाळ माणसांना उल्लू बनवण्याचा धंदा चालवला आहे. अलाबामामध्ये राहणाऱ्या एक स्वामीने हवेतून वस्तू काढणे वगैरे हातचलाखी करून आपल्या आईला नादी लावले म्हणून फ्रँक पूल हा सगळ्याच तथाकथित साधूसंतांबद्दल प्रचंड संतप्त असल्याचे कादंबरीत दाखविले आहे. या स्वामीला नंतर लहान पोरींशी बीभत्स चाळे करताना रंगेहाथ पकडून गावातून हाकलून दिले जाते असेही फ्रँक म्हणतो. कट्टर धर्मश्रद्धा असणारे लोक जर प्रामाणिक असतील आणि दांभिक नसतील, तर धार्मिक लोकांपैकी नव्वद टक्के लोक वेडेच असतात असेही एक विधान डॉ.टेड करतो. डॉ.चंद्र याला टेड आपला हीरो मानतो; खरा जीनियस मानतो. पण हा चंद्र जेव्हा त्याला गणपतीच्या मूर्तीची पूजा करताना दिसतो तेव्हा आश्चर्य वाटते. (कादंबरीत गणपतीच्या नावाने उल्लेख नाही. दोनपेक्षा जास्त हात असलेला व हत्तीसारखा दिसणारा असा पुतळा- असा उल्लेख आहे. पृष्ठ १२१) धर्म ही एक मनोविकृती आहे; मी निरीश्वरवादी आहे असे लोक म्हणतात, पण निरीश्वरवाद मुळात सिद्ध करता येत नाही. **धर्म हा मनोविकृती विज्ञानातला एक अभ्यासविषय आहे असे तो म्हणतो. धर्म हे भीतीचे एक रूप आहे, गूढ व प्रतिकूल निसर्गाशी लढताना वाटणाऱ्या भीतीतून धर्माचा जन्म झाला.** इतिहासकाळात कदाचित धर्म हा दुष्टपणा अटळ असेल; पण आता त्याची गरज संपलेली आहे. तो कशाला हवा? भीतीतून क्रौर्य निर्माण होते. पंथापंथांची स्पर्धा वाईट पातळीवर चालते. असे सांगून टेन खान म्हणतो की, ''मी तर कधी कसतीही भक्ती केलेली नाही. मी देव मानत नाही.''


यावर इंदरा फ्रँक पूलला संदेश पाठवते, ''टेडला देवाचा शोध घ्यायचा आहे... देव अजून दडून बसलेला आहे. म्हणून टेड देवावर रागावलेला आहे... माझं हे मत मात्र त्याला सांगू नकोस.''

''संस्कृती आणि धर्म या दोन परस्परविराधी गोष्टी आहेत. श्रद्धा म्हणजे जे सत्य नाही हे माहीत आहे, त्यावर विश्वास ठेवणे'' ही टेडची दोन वाक्ये पृथ्वीवर प्रसिद्ध असतात. (२५) इंदरा तर त्याला शेवटचा जेझुइट मानते, आणि थॉटरायटरवरून आपले विचार फ्रँकला कळवते. (९५)

'ओडिसी'मालिकेतील या चारही कादंबऱ्यांतून ग्रहगोलांवरच्या मोहिमांचे एक वेगळेच विश्व आपल्यासमोर खुले होते, चित्रपटांमुळे या विश्वाचे एक भयचकित करणारे रूपही डाळ्यांपुढे उभे राहते. आर्थर सी.क्लार्कला या कादंबऱ्यांनी आणि चित्रपटांनी अमाप कीर्ती, पैसा आणि लोकप्रियता मिळवून दिली. अंतरिक्षयान, तंत्रज्ञान, अंतरिक्ष संशोधन- परग्रहांचे ज्ञान याबाबतच्या मोहिमांना चालना दिली. त्यामुळे या कादंबऱ्यांची आपल्या तरुण शास्त्रज्ञांनी पारायणे करायला हवीत. डॉ.अब्दुल कलाम यांच्या सारखा 'रॉकेट'क्षेपणास्त्र क्षेत्रातील अग्रगण्य शास्त्रज्ञ आता भारताच्या राष्ट्रपतीपदी विराजमान होत आहे; तेव्हा या क्षेत्रात नवी मुसंडी मारण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे.

**पृष्ठे : २०८ किंमत : १६०रु. सभासदांना :१२०रु. पोस्टेज :२०रु.**






# विद्रोही -ओशो

## अनु. माधुरी काबरे

**विद्रोहातूनच नवी मानवता व नवे युग यांचा उदय होईल**

विद्रोहातूनच नवी मानवता व नवे युग यांचा उदय होईल.

ओशो रजनीश यांची अनेक पुस्तके मराठीत मेहता पब्लिशिंग हाऊसने देखण्या स्वरूपात प्रसिद्ध केली आहेत. विद्रोही हे त्यांचे नवे पुस्तक दि रिबेल या पुस्तकाचे भाषांतर आहे. पहिल्या तेरा प्रकरणांचा समोवश यात केलेला आहे. माधुरी काबरे यांनी हे भाषांतर केले आहे.

ओशो हे कुठल्या धर्माचे होते? धर्माबद्दलची त्यांची संकल्पना काय होती? त्यांना भविष्यकाळात माणसाची प्रगती कुठल्या दिशेने होणे अपेक्षित होते? असे काही प्रश्न मनात आले तर आश्चर्य नाही. कारण ओशोंनी जैन, बौद्ध, ख्रिस्ती, इस्लाम, चिनी, झेन, सुफी आणि इतरही अनेक धर्मांवर लिहिले आहे. धर्मसंस्थापक आणि साधुसंत व तत्त्वज्ञ यांच्यावर लिहिले आहे. ते स्वत: जन्माने जैनधर्मीय होते. आणि त्यांच्या विचारांवर जैनधर्माचा बराच प्रभाव आहे. तरीही कुठल्याही धर्माचे कर्मकांड त्यांना मान्य नव्हते आणि त्या त्या धर्माची रूढ चौकटही त्यांना पसंत पडत नव्हती. त्यांची प्रज्ञा स्वतंत्र होती; तिला जे उमगत होते ते वेगळेच काही होते, आणि त्यामुळे रूढ संकल्पनांचेही नवेनवे अर्थ त्यांच्या प्रज्ञाचक्षूंसमोर सतत झेपावत होते.

माझा कुठल्याच धर्मावर विश्वास नाही; जगात तीनशेवर धर्म अस्तित्वात असले तरी अजूनपर्यंत खरा धर्म अस्तित्वात आलेला नाही; भय आणि हाव यांचा विचार करून विविध धर्मांनी दिलेल्या आज्ञा ह्या एकापेक्षा एक विचित्र आणि अस्वाभाविक आहेत, असे ते सांगतात. मात्र धर्म नाकारला तरी धार्मिकता हवीच असे ते म्हणतात.

**सृष्टीपाशी कृतज्ञतेनं वागणं म्हणजे धर्म. कृतज्ञतेची भावना म्हणजे धर्म. सत्याचा साक्षात्कार व्हायचा असेल, जीवनात परिपूर्ण शांततेचा प्रत्यय यावा असे वाटत असेल ध्यानाची साधना आवश्यक आहे. परमात्मा म्हणजे माणसाची चेतना आणि आत्म्याचा अणू यांचा स्फोट होऊन निर्माण होणारी ऊर्जा... ही ऊर्जा. स्वत:च्याच विकासातून जन्म घेते. या शक्तीचा अनुभव म्हणजे परमात्मा... आणि त्यासाठी आवश्यक गोष्ट म्हणजे ध्यानधर्म, असे त्यांचे ठाम प्रतिपादन आहे.**

## पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

ओशो रजनीश सर्व धर्म हे त्याज्य मानतात. तरीही ते एक धर्म मानतात.

कृतज्ञतेची भावना म्हणजे धर्म. त्यासाठी ध्यानाची गरज असते. ध्यान म्हणजे स्वत:मध्ये जागरूकता निर्माण करणे.

ध्यान म्हणजे जप नव्हे.

विद्रोह हे अध्यात्माचे विशुद्ध रूप.

माणसाला आपल्यातील चैतन्याचा साक्षात्कार होण्याची उत्कट अभिलाषा असेल तर त्याला ध्यान हाच एकमेव मार्ग उपयुक्त आहे. ध्यान ही आध्यात्मिक किंवा धार्मिक गोष्ट नाही; ध्यानासाठी कुठेही निर्जन स्थानी जाण्याची गरज नाही; ध्यान ही मनाला हलकंफुलकं करणारी, निर्मळ-निर्विकार करणारी, केवल आनंद देणारी गोष्ट आहे, असे ओशो मानतात. माणूस हा जन्माने अपूर्ण आहे; पूर्णत्वासाठी त्याला काही कृती करावी लागते. पूर्णत्व न मिळण्याची अवस्था म्हणजे आजारपण. शारीरिक-मानसिक व्याधीतून मुक्ती हवी असेल तर ध्यान हवेच. **ध्यान म्हणजे स्वत:मध्ये जागरूकता निर्माण करणे. ही जागरूकता निर्माण झाली की मरणाचे भय सरते. ध्यान म्हणजे जागे राहणे. ध्यान ही पद्धती आहे. समाधी ही उपलब्धता आहे. ध्यान म्हणजे जागरण बघणे. साक्षीत्व. ध्यान म्हणजे जप करणे नव्हे. जप करणे ही क्रिया आहे. ध्यान ही अक्रिया आहे.**

विद्रोही या पुस्तकातील तेरा प्रवचन-प्रश्नोत्तर सत्रांमधून ओशोंच्या धर्मविषयक संकल्पनेचा दुसरा एक पैलू अधोरेखित होतो.

विद्रोह हे त्यांना अध्यात्माचं शुद्ध रूप वाटतं. विद्रोह हेच त्यांना धार्मिक व्यक्तीचं व्यवच्छेदक लक्षण वाटतं. आपण लोकांना क्रांतीचे धडे देत नाही, आपण विद्रोह शिकवतो असे ओशोंनी म्हटले आहे. ''क्रांतिकारक हे अतिसामान्य मर्त्य पातळीवरचे असतात. विद्रोही व त्याचा विद्रोह मात्र दिव्य पातळीवरचा असतो. पवित्र असतो.'' असे ते मानतात.(पृष्ठ३)

माणसाची चेतना ही गेली अनेक शतके विशिष्ट चाकोरीतच फिरत आली आहे. तिच्यात बदल झालेला नाही. त्यामुळे तिची वाढही खुंटली आहे. या मानवी चेतनेत परिवर्तन घडवून आणणे हे आवश्यक आहे. त्यासाठी ध्यानात्मक ऊर्जा हवी. सडलेले आदर्श, बिनडोक भेदभाव, मूढ अंधश्रद्धा यांचा लोप झाला पाहिजे आणि नवा माणूस जन्माला आला पाहिजे. हा नवा माणूस भूतकाळाची झापडं झुगारून दिलेला, नव्या नजरेनं बघणारा हवा. ओशोंच्या भाषेत भूतकाळाशी असलेले सर्व जुनाट संबंध तोडणारा तो विद्रोही. गौतमबुद्ध, कबीर हे त्यांच्या दृष्टीने विद्रोही होते. असे विद्रोही मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले नाहीत तर पृथ्वीवरचे माणसाचे अस्तित्वच धोक्यात



येईल असा इशारा ओशो देतात.(४)

सुधारणा, क्रांती आणि विद्रोह या तीन शब्दांचा आशय ते स्पष्ट करतात. सुधारणा म्हणजे फेरफार. नूतनीकरण. मूळ गाभ्याला धक्का न लावता केलेला बदल. क्रांती जुनं ते शिल्लक ठेवते पण त्यात खूप बदल करते. जुन्याचा भक्कम पाया तसाच राहतो पण वर मजले चढतात. विद्रोह म्हणजे स्वत:ला जुन्यापासून पूर्णपणे तोडण्याची कृती. जुने धर्म, जुने राजकीय सिद्धान्त, जुना माणूस- या सर्वांना स्वत:मधून पूर्णपणे छाटून टाकून, त्या धावातून नवं ताजं आयुष्य सुरू करणं. जुन्याचा मृत्यू आणि नव्याचा जन्म. पुनरुत्थान. पुनरुज्जीवन. पुनर्जन्म. क्रांतिकारक जुन्याला बदलण्याची धडपड करतो. विद्रोही सरळसरळ जुन्यातून बाहेर येतो. (५) क्रांत्या खूप होतात. पण त्या बहुतेक फसतात. क्रांतिकारकांच्या हातूनच त्या फसतात. सत्ता हाती आली की क्रांतीच्या मूळ उद्दिष्टांचाचा विसर पडतो. (६) त्यामुळे भविष्यात क्रांत्यांची गरजच नाही. गरज आहे ती विद्रोहाची आणि विद्रोही व्यक्तींची. नव्या दृष्टीच्या नव्या माणसांची.(८)

मला आज्ञाधारक अनुयायी नको आहेत; मला जिज्ञासू, विद्रोही साधक हवे आहेत. मला होयबा नको आहेत. शंका घेतल्याशिवाय अस्सल विश्वास ठेवता येत नाहीत असे विद्रोही हवे आहेत अशी अपेक्षा ओशो पुन:पुन्हा प्रकट करतात.(४२)

विद्रोही माणसाची काही वैशिष्ट्ये ओशो समजावून सांगतात.

१. विद्रोही आपल्या स्वत:च्या अनुभवाखेरीज दुसऱ्या कशावरही विश्वास ठेवत नाही. त्याचं सत्य हे त्याचं एकमेव सत्य असतं.

२. ठराविक गोष्टींवर श्रद्धा ठेवणाऱ्या कोणत्याही पारंपरिक धर्माला विद्रोही मानत नाही. जुमानत नाही. तो स्वत: शोध घेत जाणारा साधक असतो. तो धर्म मानत नाही याचा अर्थ तो अहंकारी असतो असा नाही. तो स्वत:लाच परिपूर्ण, सर्व काही मानत असतो.

३. तो अहंकारी नसतो. निरागस असतो. त्याचं विश्वास ठेवणं हे उर्मटपणातून नव्हे तर विनम्रतेतून आलेलं असतं.

४. विद्रोही कुठल्याही चर्चचा वा संस्थेचा नसतो. कुणाचीही नक्कल करणारा नसतो. पूर्वग्रहांशिवाय तो आपला शोध नम्रपणे चालू ठेवत असतो.

५. विद्रोही माणूस स्वत:च्या स्वातंत्र्याचा सन्मान करतो तसाच दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचीही बूज राखतो.

६. विद्रोही माणूस भूतकाळात जगत नाही; भविष्यकाळातही जगत नाही. तो वर्तमानात जगतो. शक्य तितक्या जागरूकपणाने आणि सावधपणाने. त्या त्या क्षणात तो जगत असतो.

७. इतरांवर वर्चस्व गाजवण्यात विद्रोही माणसाला काडीमात्र रस नसतो. त्याला सत्तेची लालसा नसते.

८. विद्रोही माणूस आपलं संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यात जगतो. त्यात कुणालाही ढवळाढवळ करू देत नाही आणि दुसऱ्यांच्या आयुष्यात तो ढवळाढवळ करीत नाही.

९. विद्रोही माणूस हा आपल्या आत्म्याचा शास्त्रज्ञ असतो. आपल्या आंतरिक यात्रेसाठी तो विज्ञाननिष्ठ मनाने शंका-नकार-चौकसपणा यांचा वापर करून आपली शोधयात्रा अधिकधिक निर्दोष व्हावी म्हणून प्रयत्नशील असतो.

१०. विद्रोही हा मूलत: अज्ञेयवादी असतो. आपल्याला काहीही माहीत नाही इथपासून तो

आरंभ करतो. बालसदृश निरागसपणा हेही विद्रोही माणसाचे एक लक्षण असते.

११. विद्रोही माणूस खऱ्या अर्थाने क्रांतिकारक असतो तसाच धार्मिकही असतो. तो कोणतीही संघटना निर्माण करीत नाही. परंतु तो सहप्रवासी म्हणून एकमेकांच्या स्वत्वाला धक्का न लावता इतरांबरोबर राहू शकतो. (४९-५५)

१२. विद्रोही माणूस जगाचा वा समाजाचा त्याग कधीही करीत नाही. मात्र समाजाने लादलेल्या तथाकथित नैतिकतेचा, मूल्यांचा, बंधनांचा त्याग तो नक्कीच करतो. गर्दीत राहूनही गर्दीच्या आदेशानुसार तो वागत नाही; स्वत:च्या विवेकबुद्धीनेच वागतो.(६६)

१३. विद्रोही माणसाच्या आयुष्यात येणारी प्रत्येक परिस्थिती रोमहर्षक असते. हरक्षणी तो समस्येशी सामना करीत असतो.

१४. विद्रोही माणसाचा परित्याग हा गौतम बुद्धाच्या त्यागापेक्षाही मोलाचा असतो. समाजात राहून तो समाजाशी झगडत राहतो.

१५. विद्रोही माणूस समाजाचे तथाकथित आदर्श, नैतिक संकेत, धर्म तत्त्वज्ञान, रीतिरिवाज, अंधश्रद्धा या संगळ्यांचा त्याग करतो. पण समाजाचा त्याग करीत नाही. जगावर तो प्रेम करतो. हे जग हा आपल्या जीवनाचा मूलस्रोत आहे. त्याला नाकारणं म्हणजे जीवनविन्मुख होणं. सर्व धर्म हे जीवनविरोधी व नकारात्मक आहेत. (७०)

१६. विद्रोही माणूस जगाचा निषेध करीत नाही. आदर करतो. कोणत्याही स्वरूपातील जीवन तो सन्माननीय मानतो.

१७. विद्रोही असणं म्हणजे एका पूर्णपणे नव्या आयुष्याची सुरुवात करणं. एका नवीन मानवतेची, एका नवीन माणसाची सुरुवात करणे. (७१) विद्रोहातच आपल्यातील सुप्त सामर्थ्याचा पूर्ण विकास संभवतो.

१८. तुम्ही विद्रोही असला तरच तुमच्या अवतीभवती विद्रोह पसरवू शकाल. तुम्ही पेटलेले असाल तरच तुम्ही वणवा पेटवू शकाल. स्वत:ला अनुभव आल्याखेरीज दुसऱ्याला मदत करायला जाऊ नका. जगात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर प्रथम स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणा. (७४)

१९. विद्रोही म्हणजे सगळ्या परिवर्तनाचे बीज. विद्रोही म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य. निखळ प्रेम. पूर्ण सर्जनशीलता.

२०. नवा विद्रोही हा आत्मबोध झालेला माणूस असतो. गाढ समाधानी आणि तृप्त असतो. अलिप्त आणि एकटा असतो. झुंडीच्या शृंखलेपासून मुक्त असतो. नवा विद्रोही हा योद्धा असतो. अमानुष, अयोग्य, अनुचित, अशास्त्रीय असं जे जे आहे त्यांच्याशी लढणारा तो योद्धा असतो.

२१. नवा विद्रोही माणूस माणसाच्या प्रतिष्ठेची आणि देवाच्या मृत्यूची घोषणा करतो. जुने साधुसंत कल्पित ईश्वराला अत्युच्च पातळीवर नेऊन ठेवून, माणसाला तुच्छ मानणारे होते. माणूस असणं म्हणजे पापी, पातकी असणं असं मानून मानवाची प्रतिष्ठा ते मातीमोल ठरवत होते. नवा विद्रोही असा कोणताही देव गृहीत न धरता, हाडामांसाचा जिवंत माणूस आपल्या चैतन्याच्या जागृतीद्वारे परिपूर्ण व्हावा असे मानतो.(९०)

२२. नवा विद्रोही कोणत्याही प्रकारची अपराधी भावना बाळगत नाही जे जे नैसर्गिक ते ते योग्य असे तो मानतो.



२३. नवा विद्रोही माणूस निरोगीपणाचा, संपूर्णत्वाचा पुरस्कार करून, नव्या मानवतेचा जन्म व्हावा असा आग्रह धरणारा असेल.(९३)

विद्रोही माणसाचा परिपूर्ण नमुना म्हणून बुद्ध झोर्बा यांच्याकडे ओशो बोट दाखवतात. इहवाद आणि अध्यात्मवाद यातील विरोध नष्ट करणं हा त्याचा विद्रोह होय. देह व आत्मा एकत्रित आहेत. संपूर्ण अस्तित्व चैतन्यमय आहे, संपूर्ण अस्तित्व हे उर्जेचंच क्षेत्र आहे असे बुद्ध झोर्बाला जाणवते. ''हा माझा अनुभव आहे. हे काही माझं तत्वज्ञान नाही.'' असे ओशो नि:संदिग्धपणे बजावून सांगतात. (१०१). बुद्ध असणारा झोर्बा ही सर्वात समृद्ध शक्यता आहे. झोर्बा हा अपूर्ण असतो. बुद्ध बनलेला झोर्बा हा मात्र पूर्ण असतो. (१०२) झोर्बा व बुद्ध हे नव्या युगातल्या नव्या माणसाचं नाव आहे. ओशो येथे बुद्ध हा शब्द गौतम या आत्मज्ञानी माणसाचं विशेषण म्हणून वापरत नाहीत, तर जागरुक माणूस म्हणून वापरतात.

जीवनाच्या प्रत्येक समस्येचा विचार करताना हा नवा विद्रोही माणूस तिच्या मूळापर्यंत जाईल. लक्षण दडपण्याचा प्रयत्न करणार नाही; असे सांगून न्यायव्यवस्थेकडे तो वेगळ्या दृष्टीने कसा पाहील याचे मूलगामी विश्लेषण ओशोंनी केले आहे. (११० ते ११७)

बुद्धावस्थेला न पोचलेला विद्रोही हा नुसताच आंधळा नसतो तर तो पिऊन तर्र झालेला असतो. त्याचा विद्रोहीपणा हा प्रतिक्रियात्मक असतो. अस्सल नसतो असेही ओशो स्पष्ट करतात. (१४६) बुद्धत्व व विद्रोही या दोन्ही घटना एकाच वेळी घडणाऱ्या आहेत असे ओशो मानतात. त्यांच्या मते गौतम बुद्ध हा पूर्णतया बुद्ध पुरुष होता; पण तो विद्रोही नसलेला बुद्ध होता. (१४७) बाकुनिन, बुखारिन, कॅमस हे लोक विद्रोही तत्त्वचिंतक होते पण बुद्धत्वाचा अनुभव नसलेले होते. त्यांची पुस्तकं समाजानं करमणूक म्हणून वाचली, असा शेराही ओशो नोंदवतात.


शेवटी ओशो एक विलक्षण विधान करतात. ''जो विद्रोही नाही तो माझ्याजवळ येणारच नाही. तो माझ्याजवळ आला ही वस्तुस्थितीच त्याच्या विद्रोही असण्याचा पुरावा आहे... विद्रोही हा जन्मावाच लागतो, तो घडवता येत नाही.'' (१५७-१५८)

पुढे जाऊन ओशो म्हणतात,''प्रत्येक व्यक्ती ही विद्रोही म्हणूनच जन्मते. स्वतंत्र म्हणून जगण्याचा अधिकार घेऊनच ती जन्मते. मुखवटा घेऊन वावरण्यासाठी ती जन्मत नाही. पण समाज या व्यक्तीला मुखवटा चढवून जगायला भाग पाडते. (१६०) विद्रोही हा शब्द ओशोंना नकारात्मक वाटत नाही. सकारात्मक अर्थानेच ते त्याचा वापर करतात. (१६१) विद्रोहातून एक नवी मानवता जन्माला येईल. प्रेमाच्या रेशमी धाग्यांनी बाधलेली, धर्म-राष्ट्रे-पंथभेद नसलेली पण धार्मिकता असलेली. जीवनाबद्दल नितान्त आदर असलेली... अस्तित्वाबद्दल खोल कृतज्ञता असलेली...'' अशी विद्रोही माणसे घडवण्यासाठी आपण प्रशिक्षण देतो, आणि त्यातून योद्धे घडवतो- अशी कबुलीही ओशो देतात.

जुन्या धर्मांचा बुरखा निर्दयपणे फाडून, नव्या विद्रोहासाठी जागा करावी अशी त्यांची अपेक्षा-अभिलाषा आहे.

आपल्या संपूर्ण विचारधारणेलाच आमूलाग्र बदलून टाकणारी मते ओशो अत्यंत प्रभावीपणे मांडतात. विद्रोहाद्वारेच आत्मविकासाचा मार्ग सापडू शकेल हा विचार अनेक रंजक किस्से व कहाण्या सांगून ते मनावर ठसवतात.

**पृष्ठे : १७६ किंमत : १२०रु. सभासदांना :९०रु. पोस्टेज :२०रु.**




## त्रास सहन करूनही पुढे जाणाराच यशस्वी होतो : सिंधुताई सपकाळ

''आयुष्यात त्रास सहन करूनही जो पुढेच जाण्याचा प्रयत्न करतो, तोच यशस्वी होतो. त्यामुळे अश्रूंनाही हसरे करून जगले पाहिजे.'' असे विचार ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांनी सोमेश्वर येथे व्यक्त केले. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे जिल्हा भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन व राळेगणसिद्धी परिवारतर्फे सिंधुताईंना 'कर्मयोगी पुरस्कार'देण्यात आला.

त्या पुढे म्हणाल्या, ''स्त्रियांमध्ये जगण्याचे सामर्थ्य असून, स्त्रियांनीच साथ दिल्यामुळे शिवाजीमहाराज, डॉ.आंबेडकर, महात्मा गांधी मोठे कार्य करू शकले. मात्र सध्या जिजामाता, रमाबाई व सावित्रीबाईंचे पुतळेही पाहायला मिळत नाहीत. वैयक्तिक जीवनात मी त्रासाची कधीही उजळणी करत बसले नाही, तर असा त्रास इतरांना होऊ नये म्हणूनच समाजसेवेचे व्रत हाती घेतले. त्यामुळेच मी आज १०४२ लेकरांची आई होऊ शकले.''

एकूण ६३ पुरस्कार मिळालेल्या सिंधुताईनी अनाथ मुलांच्या संगोपनात पाण्याची टंचाई ही प्रमुख अडचण असल्याचे सांगितले. अजूनही पाचशे रुपये दिल्याशिवाय टँकर येत नाही, त्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

पुण्याच्या संचेती हॉस्पिटलाचे संचालक डॉ.के.एच.संचेती यांनी या वेळी सिंधुताईंना ५१ हजार रुपयांची मदत जाहीर केली.

या वेळी सिंधुताईना एक हजार एक रुपयांचा पुरस्कार डॉ.संचेती यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी मावळ तालुका भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाच्या वतीने आमदार दिगंबर भेगडे यांना लोकनायक पुरस्कार व बाळासाहेब काशीद यांना युवा पुरस्कार देण्यात आला.

आमदार दिगंबर भेगडे, राळेगणसिद्धीचे माजी सरपंच गणपतराव आवटी, र.ना.मावकर, के.डी.पवार, श्री.काशीद यांची या वेळी भाषणे झाली. बारामती तालुका भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे अध्यक्ष पांडुरंग देशमुख यांनी आभार मानले.

## कवी अनिल कांबळे यांना विवेकानंद पुरस्कार प्रदान

''कळले न ऋतू शब्दांचे हलकेच बहरले केव्हा, कवितेचे रंग रुपेरी प्राणात मिसळले केव्हा... अशा पद्धतीने माझ्याच नकळत मी कविता करत गेलो. बालपणापासून सारे अनुभव, संवेदनशीलता मनात झिरपत गेली आणि त्याचीच कविता झाली.''या शब्दात कवी अनिल कांबळे



यांनी आपल्या कवितेची कहाणी सांगितली.

स्वामी विवेकानंद मित्र मंडळ आणि विवेकानंद काव्य पुरस्कार समितीतर्फे चंद्रकांत गोखले यांच्या हस्ते कांबळे यांना 'विवेकानंद काव्य पुरस्कार' देण्यात आला.

श्री.कांबळे म्हणाले, ''संगीतासारखा कवितेलाही रियाज करावा लागतो. आपल्या अनुभवांचा, विचारांचा रियाज जोपर्यंत शब्दांत उतरत नाही, तोपर्यंत चांगल्या कवितेची निर्मिती होत नाही.''

यावेळी प्रसिद्ध व्यंगचित्रकर मंगेश तेंडुलकर, ज्येष्ठ समीक्षक वि.भा.देशपांडे, खासदार प्रदीप रावत, माजी आमदार अरविंद लेले आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र शाहीर पुरस्कार जेवळे, कुलकर्णी यांना जाहीर

महाराष्ट्र शाहीर परिषदेचा यंदाचा 'महाराष्ट्र शाहीर भूषण पुरस्कार' वेला (जि.नागपूर) येथील शाहीर रतनलाल रघुनाथजी जेवळे आणि दानोली (जि.कोल्हापूर) चे शाहीर यशवंत गोपाळ कुलकर्णी यांना प्रदान केला जाणार आहे. 'युवा शाहीर पुरस्कारा'चे मानकरी कोल्हापूरचे राजू कदम, सांगलीचे देवानंद माळी व पुण्याचे गणेश टोकेकर हे आहेत.

शाहीर रामचंद्र ढेरे यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा 'शाहीर महर्षी पुरस्कार' सांगलीचे ज्येष्ठ शाहीर रघुनाथ दत्तात्रेय दीक्षित (चिंचणीकर) यांना प्रदान केला जाईल. 'शाहीर गौरव पुरस्कार नानेगाव (जि.सातारा) येथील शाहीर प्रभाकर घुलाजी कडव, मिरज येथील शाहीर शंकर अप्पा मेंढेमाळी आणि वडगाव तांदळी (नगर) येथील शाहीर चंद्रकांत नारायण रणशिंग पाटील यांना प्रदान केला जाणार आहे.

## 'समाजाची वैचारिक प्रगल्भता ग्रंथांमुळे वाढते'

''ग्रंथामुळे मनावर संस्कार होतात, तसेच त्यांच्या माध्यमातून समाजाची वैचारिक प्रगल्भता घडविली जाते. त्यामुळे पुरस्कारांच्या माध्यमातून लेखकांना प्रोत्साहन द्यायला हवे.'' असे मत 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात त्यांच्या हस्ते 'दिनबंधी कृष्णराव भालेकर'या पुस्तकाचे लेखक डॉ.भाऊसाहेब खांदवे, 'एकनाथी भागवत शब्दार्थ संदर्भ कोशा'चे लेखक डॉ.मु.श्री. कानडे आणि रा.रं.नगरकर, 'भारतीय संगीत : स्वरूप आणि प्रयोजन'चे लेखक डॉ.कृष्णचंद्र ज्ञाते, 'श्रीज्ञानदेवी : विविधांगी संशोधन खंडा'चे (भाग १) लेखक प्रा.कृष्णा गुरव, 'गीतसागर'चे लेखक विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर आणि 'महादेव मोरेश्वर कुंटे काल आणि कर्तृत्व'च्या लेखिका डॉ.पुष्पा लिमये यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

ग्रंथांना पुरस्कार देण्यासाठी संस्थेतर्फे अवलंबित येणाऱ्या परीक्षा पद्धतीचे त्यांनी कौतुक केले. परीक्षकांतर्फे डॉ.मेधा सिधये यांनी परीक्षण पद्धतीची माहिती दिली. लेखकांच्या वतीने प्रा.पुष्पा लिमये यांनी भाषण केले. कार्यवाही श्री.ना.चाफेकर यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची व ध्येयधोरणांची माहिती दिली.

उपाध्यक्षा आशा मुंडले यांनी १०८ वर्षांची परंपरा असलेल्या या संस्थेला मनुष्यबळाची व आर्थिक मदतीची अपेक्षा असल्याचे सांगितले.

# फुले आणि काटे



**कादंबरीतील देशीवाद**

मराठी कादंबरीचा उत्क्रांतीचा प्रवास लक्षात घेतला तर पुढील टप्पे दिसतात.

१. १८५७मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'यमुनापर्यटन'पासून वा.म.जोशी यांच्यापर्यंतची मराठी कादंबरी ही व्यापक सामाजिक वास्तवाला न्याय देणारी दिसते.

२. १९२०नंतर फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्या स्वप्नरंजनात्मक कृतक विश्व निर्माण करणाऱ्या, लैंगिक, रंजनप्रधान कादंबऱ्या प्रतिष्ठा पावल्या.

३. १९५०नंतर पेंडसे, खानोलकर, रेगे यांच्या अतिरेकी व्यक्तिवादाने पछाडलेल्या कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीचे अनुभवक्षेत्र अधिकच संकुचित केले.

४. १९६०नंतर खऱ्या अर्थाने मराठी कादंबरीने आपल्या भू-सांस्कृतिक कक्षा रुंदावल्या.

साठोत्तरी कादंबरीचेही दोन भाग पडतात. एका बाजूला माडगूळकर, उद्धव शेळके, नेमाडे, आनंद यादव, हमीद दलवाई, भाऊ पाध्ये, अरुण साधू, मधू मंगेश कर्णिक यांनी आशय, जीवनसृष्टी आणि शैलीचे संकेत मोडणारी नवकादंबरी निर्माण केली तर दुसरीकडे ऐतिहासिक, पौराणिक आणि चरित्रात्मक कादंबऱ्यांनी आयत्या आशयद्रव्यावर आधारित संकुचित, वर्गीय, नायकप्रधान व अतिरेकी राष्ट्रवादी अभिरुची निर्माण केली.

कादंबरी समीक्षेचा विचार केला तर वास्तववाद, सौंदर्यवाद, समूहनिष्ठ प्रादेशिकता, व्यक्तिनिष्ठ मनोविश्लेषण, अतिवास्तववाद, अस्तित्ववाद आणि देशीयता या समीक्षामूल्यांचा किंवा भूमिकांचा विकासक्रम लक्षात घ्यावा लागतो. गेल्या काही वर्षात भालचंद्र नेमाडे यांनी केलेली मराठी कादंबरीची आमूलाग्र समीक्षा आणि मांडलेला देशीयतेचा मूल्यविचार हा आता मराठी कादंबरीच्या शीर्षस्थानी आहे. विलास सारंग किंवा रा.भा. पाटणकर अशा मान्यवरांची देशीयतेच्या सिद्धांताला असलेली अस्वीकृती लक्षात घेऊनही मराठी भूभाग, मराठी लोकभाषा, मराठी लोकसाहित्य, मराठी संतकवी, मराठी शाहीर आणि स्वातंत्र्योत्तर बहुजन समाजातील बदल यांच्या एकजीव मिश्रणातून निर्माण झालेल्या वास्तवाला सर्जनाच्या पातळीवर कवेत घेणारा आणि न्याय देणारा समीक्षाविचार मला महत्त्वाचा वाटतो.म्हणून देशीयतेच्या भूमिकेतून गेल्या दशकातील कादंबऱ्यांबद्दल निरीक्षणे नोंदवावीशी वाटतात.

प्रत्येक कालखंडात एखादा वाङ्मयप्रकार प्रभाव गाजवित असतो. गेल्या दशकाचा विचार



केला तर आत्मचरित्रांचा प्रभाव दिसतो. दलित स्वकथनांनी या प्रकाराला नवे परिमाण मिळवून दिल्याने आत्मचरित्राने कादंबरीवर काहीसे आक्रमण केले असे म्हणता येते. आनंद यादव यांनी 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती', व 'काचवेल'या कादंबऱ्यांचा उल्लेख आत्मचरित्र असा केला असला तरी त्यांना आत्मचरित्रात्मक कादंबरी असेच म्हणावे लागते. कारण या पुस्तकांमध्ये नायकाच्या केंद्राभोवती चार पिढ्यांचे मराठी ग्रामजीवन व मध्यमवर्गाचे वास्तवही चित्रित झाले आहे. ते जितके वैयक्तिक आहे, तेवढेच प्रातिनिधिकही आहे. तेथे वास्तवाचे डॉक्युमेंटरी चित्रण नाही. विशिष्ट नैतिक भूमिकेतून वास्तवाची पुनर्मांडणी केली आहे. (येथे नरेंद्र जाधव यांच्या 'आमचा बाप अन् आम्ही'या पुस्तकाची आठवण होते. हे शुद्ध आत्मचरित्र आहे, कादंबरीत अपेक्षित असलेली वास्तवाच्या आकलनाची भूमिका त्यात नाही.) ग्रामीण साहित्याची तात्त्विक भूमिका मांडताना यादवांनी ज्या समूहनिष्ठ संवेदनेचा वारंवार उच्चार केला आहे, त्याचेच उपयोजन या कादंबऱ्यांमध्ये केले आहे आणि ते देशीयतेचेच एक लक्षण आहे.

हेच सूत्र घेऊन वि.स.जोग यांची 'आम्ही', किशोर सानप यांची 'पांगुळगाडा', आणि रमेश अंधारे यांची 'पागोरा'या कादंबऱ्यांचा उल्लेख करावा लागतो. या कादंबऱ्या केवळ प्रथमपुरुषी निवेदनशैलीतील आहेत असे नव्हे तर यात एकीकडे नायकाच्या आंतरिक अस्तित्वाचे भान आहे, तर दुसरीकडे बाह्य वास्तवाबद्दलची कृतिशील जाणीव आहे. त्यातील सगळे ताणतणाव व्यक्तिकेंद्री नाहीत तर त्याला विवेकनिष्ठेचे केंद्र आहे. जात, धर्म, एकत्र कुटुंब, गावगाडा आणि आर्थिक प्रश्नांची गुंतागुंत झालेले, निर्बुद्ध, आधुनिकिरणात विस्कटलेले समूहजीवन आहे. यातील 'पागोरा'चा प्रारंभी स्वीकारलेला रचनाबंध लेखकाला पेलवला गेला नाही. पुढे पुढे केवळ तपशीलाच्या सपाट नोंदी येतात. परंतु आपला परिसर, कुटुंब यातून उगवलेल्या 'मी'चे जे मूल्यनिष्ठ दर्शन दिसते. त्याची प्रेरणा देशीवादातच आहे, हे लक्षात येते.

कादंबरीतील सामाजिक आशय हा विशाल असावा, एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भांसकट मांडलेला असावा, एखाद्या पोटसमूहाचे पोटसंस्कृतीसह दर्शन घडविलेले असावे आणि संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असावा, अशी कादंबरीविषयीची संकल्पना आता सर्वमान्य झाली आहे. 'बनगरवाडी', 'वासूनाका'या कादंबऱ्यांनी असे आदर्श निर्माण केले आहेत. याच प्रेरणेतून या दशकात विश्वास पाटील, रंगनाथ पठारे, बाबुराव बागूल, उत्तम बंडू तुपे, बाबाराव मुसळे, राजन गवस, नामदेव कांबळे, मधुकर वाकोडे, पुरुषोत्तम बोरकर आणि रवींद्र शोभणे या लेखकांच्या कादंबऱ्यांची निर्मिती झाली आहे.

विश्वास पाटील यांच्या 'पांगिरा'मध्ये आधुनिक सुधारणांचे आगमन आणि बलुतेदारीचे विसर्जन या संघर्षात होरपळणाऱ्या समाजमनाचे प्रत्यकारी चित्रण आहे. नैसर्गिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रदूषणामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचा मोठा पट लेखकाने येथे उभा केला आहे. तर त्यांच्या 'झाडाझडती'या कादंबरीत धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नाचा अतिशय सूक्ष्म विचार कथात्मक अनुभवातून व्यक्त केला आहे. समूहनिष्ठा, समस्येचा वेध आणि मातीच्या ऋणानुबंधाचे नैतिक चित्रण ही वैशिष्ट्ये देशीयतेचेच भान व्यक्त करणारी आहेत.

'हारण', 'टोकदार सावलीचे वर्तमान' आणि 'ताम्रपट'या रंगनाथ पठारे यांच्या तीन कादंबऱ्या या दशकात प्रसिद्ध झाल्या आहेत. 'ताम्रपट'मध्ये १९४२ ते १९७९या काळातील

महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक जीवनाचा नमुनेदार छेद घेतला आहे. यात केवळ रंजनवादी पद्धतीचे नायकप्रधान चित्रण नाही तर ग्रामपातळीवरील सत्तास्पर्धा, सहकारी संस्था, शिक्षणसंस्था, जातीयता आणि सामान्यांचे प्रश्न यांचा व्यामिश्र वेध घेतला आहे. वस्तुनिष्ठ समाजदर्शनाचा मोठा आवाका तेवढ्याच समर्थ नैतिक जाणिवेतून पठारे यांनी पेलला आहे. मराठी कादंबरीच्या उत्क्रांतीमधील विकसित रूपाचे उदाहरण म्हणून या कादंबरीकडे बोट दाखविता येईल. 'हारण', 'टोकदार सावलीचे वर्तमान'या दोन्ही कादंबऱ्यांत स्त्रीपुरुष संबंधातील उभे आडवे धागे समकालीन सामाजिक पर्यावरणाच्या पार्श्वभूमीवर सर्व ताणतणावासह पठारे रेखाटतात.

बाबुराव बागुल यांच्या 'कोंडी'मधला नायक विद्रोह आणि सौंदर्य यांच्या कोंडीत सापडलेला आहे. सभोवतालच्या भीषण वास्तवाला पचवून 'कोंडी'मधला नायक पावन हा कविता करतो. उत्तम बंडु तुपे यांची 'झुलवा'ही जोगतिणी, देवदासीची समस्या मुळापासून मांडणारी कादंबरी आहे. बाबाराव मुसळे यांची 'पखाल'ही बारा बलुतेदारांपैकी कोळी समाजाच्या पखालीने पाणी भरण्याच्या बलुत्याच्या निमित्ताने पुन्हा जातीय, वर्गीय आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत होरपळणाऱ्या गरीब कुटुंबाची कहाणी आहे. नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ'या कादंबरीत मांग समाजातील एका मनस्वी स्त्रीच्या भोवतालच्या वास्तवाचे आकलन आहे, मधुकर वाकोडे यांच्या 'सिलिपशेरा'मध्ये भटक्या भोई समाजाचे समस्याप्रधान चित्रण आहे. रवींद्र शोभणेंच्या 'कोंडी'त शेतमजुरांच्या संघर्षाचे चित्रण आहे. तर 'मेड इन इंडिया'ने नावाजलेल्या त्या पुरुषोत्तम बोरकर यांच्या 'आमदार निवास रूम नं.१७५६'मध्ये राजधानीतील सामाजिक सांस्कृतिक राजकारणाचा तिरकस शैलीत वेध घेऊन नायकाच्या नैतिक भूमिकेविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

गेल्या दशकातील महत्त्वाच्या सर्व कादंबऱ्या समस्याप्रधान आहेत. समूहनिष्ठ आहेत. समाजाच्या तळागाळाचे, त्यातील पोटसंस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या आहेत. या कादंबऱ्यांमधील नायकांचे किंवा पात्रांचे व्यक्तित्व सुटे नाही. गरिबी आणि शोषणाच्या व्यवस्थेत त्यांची होणारी घुसमट ही केवळ त्याची किंवा त्यांच्या समाजाचीच नाही तर महाराष्ट्रातील नव्वद टक्के सामान्यांची आहे. सुधारणा आणि प्रगतीच्या सरकारी आकडेवारीमागे दडलेले ते समकालीन सत्य आहे. या लेखकांच्या नैतिक जाणिवांमधून झालेली वास्तवाची मांडणी कादंबरीचेच रूप घेऊ शकते. ते कादंबरीशिवाय इतर वाङ्मयप्रकारातून शक्य नाही. त्यासाठीच कादंबरीचा जन्म आहे. हे सगळे इतक्या सामूहिकपणे आविष्कृत झाले आहे की जणू काही ठरवून झाले आहे, हे असे होण्याचे कारण म्हणजे युगजाणिवेच्या पातळीवर देशीयतेच्या मूल्यनिष्ठा कार्यरत झाल्या आहेत. या ठिकाणी तेन या फ्रेंच समीक्षकाच्या विधानाची आठवण होते. तेनने म्हटले आहे की, ''वाङ्मयीन कृती केवळ कल्पनाविलास नसतो, खवळून उठलेल्या गरमागरम मेंदूचा तो एकाकी तरंग नसतो, तर तो असतो समकालीन आचारविचारांचा आविष्कार, विशिष्ट मनोव्यापाराचा प्रातिनिधिक अविष्कार!''

**डॉ.प्रमोद मूनघाटे, नागपूर**
**(आकांक्षा वरून)**




- जुलै २००२
- वर्ष दुसरे
- अंक आठवा


# मेहता मराठी ग्रंथजगत


- संपादक : सुनील मेहता
- कार्यकारी संपादक : शंकर सारडा
- संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर
- अंकाची किंमत १० रु.
- वार्षिक वर्गणी ८० रु. तीन वर्षांची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस


— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय -** | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **श्रद्धांजली-शान्ताबाई शेळके** | १७ |
| **पुस्तक परिचय** | |
| बिझिनेस लिजंड्स : अनु. अशोक जैन | २० |
| रिवणावायली मुंगी : राजन गवस | २७ |
| ३००१ द फायनल ओडिसी : अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३१ |
| विद्रोही (ओशो) : अनु. माधुरी काबरे | ३९ |
| **पुरस्कार** | ४४ |
| **फुले आणि काटे** | ४६ |



मांडणी-अक्षरजुळणी : ***मेहता पब्लिशिंग हाऊस***



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंट्स्, पुणे-३०.
फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*